

डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon) Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

बुधवार, दि. ०७ जानेवारी २०२६



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर

आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस

जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए

Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net



मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०५१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


स्वतः सरकारने म्हटले आहे की, झोपडपट्टीवाल्यांना हटविणार नाही, त्यांना पट्टा देणार!!




# फडणवीसांनी करप्शनवर काही बोलूच नये

## राज ठाकरेंचा आरोप, ठाकरे बंधूंच्या संयुक्त मुलाखतीचा स्फोटक टीझर; भाजपवर हल्ला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राच्या राजकारणात ठाकरे नावाचा दरारा आजही तितकाच प्रभावी असल्याचं पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. शिवसेना आणि मनसे यांच्यातील युतीनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या पहिल्यावहिल्या संयुक्त मुलाखतीचा टीझर समोर आला असून, या एका व्हिडीओनं संपूर्ण राज्याचं लक्ष वेधून घेतलं आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि प्रसिद्ध सिनेनिर्माते, दिग्दर्शक व अभिनेता महेश मांजरेकर यांनी घेतलेली ही मुलाखत राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कारण या मुलाखतीत ठाकरे बंधूंनी सत्ताधाऱ्यांवर, विशेषतः भाजपवर केलेला थेट आणि आक्रमक हल्ला पाहता आगामी राजकारणाची दिशा स्पष्ट करणारी ही चर्चा ठरण्याची शक्यता आहे.

या मुलाखतीच्या टीझरमध्ये उद्धव ठाकरे यांनी सत्तेच्या मानसिकतेवर जोरदार प्रहार केला आहे. राज्यकर्त्यांचे प्रेम हे राज्यावर असले पाहिजे, सत्तेवर असता कामा नये, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांना थेट संदेश दिला. या एका वाक्यातूनच सध्याच्या सत्तास्थापनेवर त्यांची नाराजी स्पष्टपणे दिसून येते. सत्ता टिकवण्यासाठी राज्याच्या हिताकडे दुर्लक्ष केलं जात असल्याचा आरोप अप्रत्यक्षपणे त्यांनी केला आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर त्यांच्या वक्तव्यांना वेगळंच राजकीय वजन प्राप्त झालं असून, हा टीझर म्हणजे संपूर्ण मुलाखतीचा केवळ एक झलक असल्याचं स्पष्ट होतं.

दुसरीकडे, राज ठाकरे यांनीही या मुलाखतीत तितक्याच आक्रमक शैलीत भाजपवर निशाणा साधला आहे. विशेषतः भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर थेट घणाघात केला. फडणवीसांनी करप्शनवर काही बोलूच नये, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या नैतिक अधिकारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. फडणवीसांनी यापूर्वी



ठाकरे युतीला करप्शन आणि कन्फ्यूजनची युती असं संबोधलं होतं. त्याच वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर विचारण्यात आलेल्या प्रश्नांवर ठाकरे बंधू काय उत्तर देतात, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलं आहे.

टीझर साधारण 1 मिनिट 40 सेकंदांचा असून, त्याची सुरुवातच अतिशय ठळक आणि लक्षवेधी मथळ्याने होते. संयुक्त मुलाखत, हे शब्द पडद्यावर झळकताच, ही चर्चा किती ऐतिहासिक आहे, याची जाणीव प्रेक्षकांना होते. संजय राऊत यांनी विचारलेला "महाराष्ट्राला हे चित्र पाहण्यासाठी 20 वर्षं वाट का पाहावी लागली?" हा प्रश्नच अनेक अर्थांनी महत्त्वाचा ठरतो. कारण याच प्रश्नातून ठाकरे बंधूंच्या विभाजनापासून ते पुन्हा एकत्र येईपर्यंतचा संपूर्ण राजकीय प्रवास अधोरेखित होतो. या प्रश्नावर त्यांनी नेमकं काय उत्तर दिलं, हे जाणून घेण्याची उत्सुकता राज्यभर निर्माण झाली आहे.

राज ठाकरे यांनी याच टीझरमध्ये मुंबई आणि महाराष्ट्राच्या भवितव्याबाबत गंभीर आरोप केले आहेत. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्यासाठीचा खटाटोप सुरू आहे, असं म्हणत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या राजकीय खेळीवर थेट बोट ठेवलं आहे. हा आरोप केवळ राजकीय टीका नसून, तो महाराष्ट्राच्या अस्मितेशी जोडलेला असल्यामुळे अधिक तीव्र ठरतो.

## थोडक्यात...

### दुचाकीस्वाराची शिवशाही ला धडक

धाड (समर्थ गांवकरी) : करडी गावा नजीकच्या धरणावरील पुलावरील छत्रपती संभाजीनगर रोडवर एस.टी.महामंडळाच्या शिवशाही बसला समोरुन येणाऱ्या मोटार सायकलस्वारांची जोरदारपणे धडक लागुन घडलेल्या गंभीर अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे. प्राप्त माहितीनुसार 5 जानेवारी रोजी सायंकाळी साधारण 4.30 वाजता दरम्यान छत्रपती संभाजीनगर रोडवर करडी गावाच्या नजिकच्या पुलावर एस.टी.महामंडळाची शिवशाही बस (क्र.एम.एच.06 बी.डब्ल्यू.3638) ही बस छत्रपती संभाजीनगरवरुन मलकापुरकडे जाताना वाटेत करडी गावाजवळ धाडकडून येणाऱ्या मोटारसायकल क्रमांक (एम.एच. 28 बि.झेड.7242) वर ढालसावंगी ता.बुलडाणा येथील अंकुश सुखदेव पाडळे (32) , कैलास साहेबराव शिंदे (30), रवि सुरेश चंदनशिव (23) हे तिघे भरधाव वेगाने करडीकडे जात होते. यावेळी समोरुन येणाऱ्या एसटी बसला ही दुचाकी जाऊन धडकली. दुचाकीचा वेग जास्त असल्याने मोटारसायकल थेट एसटी बसच्या समोरच्या चाकाच्या खाली दबल्या गेली तर तिघेही बाजूला फेकल्या गेले. यात तिघांचा जागीच मृत्यू झाला आहे.

### पथदिव्यांअभावी वारंवार अपघात

देवरी (अकोट) (समर्थ गांवकरी) : देवरी फाट्यासह दहीहांडा फाटा येथे अपघातांची मालिका सुरुच असल्याने वाहनचालकांचे बळी जात आहेत. अनेकांना कायमचे दिव्यांगत्व येत आहेत. परंतु संबधित अधिकारी या प्रश्नाकडे गांभीर्याने पहात नसल्याची परिसरातील ग्रामस्थांची तक्रार आहे. देवरी फाटा येथे दुभाजकाला वाहने धडकून नेहमीच अपघात घडत आहेत. देवरी फाटा येथूनच शेगावला जाण्यासाठी मार्ग आहे. या ठिकाणी सर्वाधिक वाहनांची वर्दळ असते. अशातच या ठिकाणी अपघात होऊ नये. यासाठी बांधकाम विभागाने दुभाजक उभारले असून यामुळे अपघात कमी होण्याऐवजी वाढले आहेत. अनेक वाहने दुभाजकाला धडकून किरकोळ अपघात होत आहेत.

# राजकारणाची नवी व्याख्या; सत्तेसाठी सर्व काही

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

पार्टी विथ डिफरन्स, अशी स्वतःची ओळख सांगणाऱ्या भाजपने सत्तेसाठी आपल्या राजकीय तत्त्वांनाच मुरड घातली आहे का, असा सवाल पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एका बाजूला भाजप देशभर काँग्रेसविरोधी आक्रमक भूमिका घेत असल्याचे चित्र आहे, तर दुसऱ्या बाजूला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता मिळवण्यासाठी विरोधी विचारधारांच्या पक्षांशी थेट हातमिळवणी केली जात असल्याचे दिसते. अकोला जिल्ह्यातील अकोट नगरपालिका आणि ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेत घडलेल्या घडामोडींमुळे भाजपच्या राजकीय भूमिकेतील विसंगती अधिक ठळकपणे समोर आली आहे. अकोट नगरपालिकेतील सत्तास्थापनेची गणिते पाहता भाजपला बहुमत मिळालेले नाही. 35 सदस्यांच्या नगरपालिकेत सध्या




33 जागांची निवडणूक झाली असून भाजपला केवळ 11 जागांवर समाधान मानावे लागले आहे. तरीही भाजपच्या माया धुळे या नगराध्यक्षपदी विजयी झाल्या. मात्र, बहुमताअभावी सत्तेचा डोलारा उभा करण्यासाठी भाजपने 'अकोट विकास मंच' या नव्या आघाडीची स्थापना केली आहे. या मंचात सर्वात लक्षवेधी बाब म्हणजे भाजपनंतर सर्वाधिक पाच नगरसेवक असलेल्या एमआयएमचा थेट समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अकोटमध्ये भाजप आणि एमआयएम यांच्यातील आघाडीने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या 'अकोट विकास मंचा'त भाजपसोबत ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, बच्चू कडूंचा प्रहार जनशक्ती पक्ष आणि एमआयएम हे सर्व पक्ष एकत्र आले आहेत. या नव्या आघाडीची अधिकृत नोंदणी अकोला जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. या आघाडीच्या माध्यमातून सध्या 33 सदस्यांपैकी 25 नगरसेवक भाजपच्या नेतृत्वाखाली एकत्र आले असून नगराध्यक्षा माया धुळे या 26 व्या सदस्य ठरतात. उर्वरित काँग्रेसचे सहा आणि वंचित बहुजन आघाडीचे दोन नगरसेवक विरोधी बाकावर बसणार आहेत. या आघाडीची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे भाजपने या सर्व पक्षांच्या नगरसेवकांवर थेट 'व्हिप' लागू केला आहे. भाजपचे नगरसेवक रवि ठाकूर हे या आघाडीचे गटनेते असतील आणि आघाडीतील सर्वच पक्षांच्या नगरसेवकांना भाजपचा व्हिप पाळावा लागणार आहे.


13 जानेवारी रोजी होणाऱ्या उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांच्या निवडीत ही आघाडी एकत्रितपणे मतदान करणार आहे. यामुळे अकोट नगरपालिकेतील सत्तेची सूत्रे पूर्णतः भाजपच्या हातात राहणार असल्याचे स्पष्ट होते. अकोटमधील या आघाडीवरून विरोधकांनी भाजपवर दुहेरी भूमिकेचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजपच्या माया धुळे यांनी एमआयएमच्या फिरोजाबी सिकंदर राणा यांचा 5271 मतांनी पराभव केला होता.

- अकोटमध्ये भाजप-MIM आघाडी तर अंबरनाथमध्ये काँग्रेससोबत हातमिळवणी

# 'समृद्धी'वर मेहकरजवळ धावत्या बसला आग

**बुलढाणा : (समर्थ गांवकरी)**

१ जुलै २०२३ चा तो दिवस महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही, जेव्हा समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल्सच्या अपघातात २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता. आज, ६ जानेवारी २०२६ च्या पहाटे तसाच काहीसा प्रसंग पुन्हा ओढवला. नागपूरवरून मुंबईकडे जाणारी एक खाजगी ट्रॅव्हल्स अचानक आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. सुदैवाने चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील ५२ प्रवाशांचे प्राण वाचले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटेच्या सुमारास ही ट्रॅव्हल्स नागपूरवरून मुंबईच्या दिशेने भरधाव वेगाने जात होती. मेहकर तालुक्यातील शिवनी पिसा गावाजवळ बस आली असता, इंजिनमधून धूर निघत असल्याचे चालकाच्या लक्षात आले. त्याने क्षणाचाही विलंब न करता बस रस्त्याच्या कडेला उभी केली आणि आरडाओरड करून सर्व प्रवाशांना तातडीने खाली उतरवले.



- ट्रॅव्हल्सचा झाला कोळसा, 52 प्रवाशांचे प्राण वाचले
- 'त्या' काळ्या दिवसाची आठवण

# बेईमानी करणाऱ्यांना धडा शिकवणारच : नवनीत राणांचा इशारा

**अमरावती: (समर्थ गांवकरी)**

अमरावतीच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडवणारे वक्तव्य करत भाजप नेत्या नवनीत राणा यांनी थेट आक्रमक भूमिका घेतली आहे. माझ्या विरोधात ज्यांनी काम केलं, जे खुल्या मंचावर 'यावेळी 400 पार' च्या घोषणा देत होते, ते चेहरे आठवणीत ठेवा, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. माझ्या पराभवामागे विरोधकांपेक्षा आपल्या गोटातीलच काही लोक कारणीभूत आहेत. आमच्यातच घात करणारे लोक होते, असे सांगत त्यांनी अप्रत्यक्षपणे भाजपमधील अंतर्गत गटबाजीवर बोट ठेवलं. माझा पराभव म्हणजे केवळ नवनीत राणांचा पराभव नाही, तर तो संपूर्ण शहराचा पराभव आहे, असा दावा करत त्यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली.

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवावर बोलताना नवनीत राणा यांनी भावनिक पण तितक्याच



आक्रमक शब्दांत प्रतिक्रिया दिली. लोकसभेत नुकसान कुणाचं झालं, तर आमच्या मुलांचं झालं, असं म्हणत त्यांनी हा पराभव वैयक्तिक वेदनेशी जोडला. मात्र, ही वेदना गिळून गप्प बसणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. ज्यांनी माझ्याशी बेईमानी केली, ज्यांनी पाठीत खंजीर खुपसला, त्यांचा बदला घेतल्याशिवाय नवनीत राणा शांत बसणार नाही, असा ठाम निर्धार त्यांनी जाहीरपणे व्यक्त केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे भाजपमधील अंतर्गत राजकारण पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आलं आहे.

याच भाषणात त्यांनी अमरावती शहराच्या सुरक्षेबाबत मोठी घोषणा केली. शहराच्या प्रत्येक गल्लीबोळात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. भाजपचा महापौर निवडून आला, तर शहरात सर्वप्रथम सीसीटीव्ही कॅमेरे आणि आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवले जातील, असं आश्वासन त्यांनी दिलं. आपण खासदार असताना अवघ्या पाच वर्षांत अमरावतीसाठी मेडिकल कॉलेज आणि पायलट ट्रेनिंग सेंटर आणलं, याची आठवण करून देत त्यांनी आपल्या कामाचा लेखाजोखा मांडला. सत्ता असो वा नसो, शहराच्या विकासासाठी मी लढत राहणार, असा संदेश त्यांनी दिला.

भाषणादरम्यान एक प्रसंग विशेष चर्चेचा ठरला. मंचाच्या टोकावर उभ्या असताना भाजपच्या काही उमेदवारांनी 'भाभी, खाली बघा, पडाल' असं सांगितल्याचा उल्लेख त्यांनी केला. त्यावर 'आता मी पडणार नाही' असं प्रत्युत्तर देत त्यांनी आपल्या राजकीय संघर्षाचा संदर्भ दिला. आतापर्यंत खूप काही सहन केलं, पण आता परिस्थिती बदलली आहे. ज्यांनी माझ्याशी बेईमानी केली, त्यांच्याशी मी आता सौम्य वागणार नाही, असा इशाराच त्यांनी या विधानातून दिला.

नवनीत राणा यांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संजय खोडके आणि त्यांच्या पत्नीवरही जोरदार टीका केली. मी कोणाची चमचेगिरी करण्यासाठी उभी नाही, असं ठणकावून सांगत त्यांनी थेट खोडके दाम्पत्यावर निशाणा साधला. कोणी घड्याळ घेऊन उभं आहे आणि उलटे काटे फिरवायचा प्रयत्न करत आहे, असा टोला त्यांनी लगावला. यावेळी ते तर त्यांचं नशीब होतं की मी विधानसभेत फिरले नाही, नाहीतर दोन हजारांनी निवडून आले असते ना, दहा हजारांनी पडले असते, इतकी ताकद या भगव्यामध्ये आहे, अशी घणाघाती टीका त्यांनी केली.

## ओवैसींवरही थेट निशाणा

भाषणाच्या शेवटच्या टप्प्यात नवनीत राणा यांनी ओवैसींवरही थेट निशाणा साधला. काल अमरावतीत ओवैसी येऊन गेले, बाहेर पाकिस्तान आणि हैदराबादमध्येही पाकिस्तानच असल्याची टीका करत त्यांनी वादग्रस्त विधान केलं. तुम्ही किती मुलं जन्माला घालायची हे सांगण्याचा अधिकार कुणालाच नाही, आधी तुम्ही देशात किती घुसखोर घुसवले ते सांगा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शेवटी, ज्यांनी माझ्याकडून पैसे घेऊन माझ्यासोबत बेईमानी केली, अशा लोकांना यावेळी धडा शिकवा, असं आवाहन करत त्यांनी आपल्या तीन भाजप उमेदवारांना पाठिंबा देण्याची विनंती केली. चौथा उमेदवार कोण असेल, हे मात्र त्यांनी गुलदस्त्यात ठेवत राजकीय उत्सुकता आणखी वाढवली आहे.

# भाजपचे प्रचार गीत आयोगाने नाकारले

## प्रचाराला अवघे सात दिवस शिल्लक असताना आयोगाचा मोठा निर्णय

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यभरात महानगरपालिका निवडणुकांची धामधूम सुरू असताना प्रचारालाही कमालीचा वेग आला आहे. मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये आता अवघे सात दिवस प्रचारासाठी शिल्लक राहिले असून, राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सर्वच पक्ष ताकदीनिशी मैदानात उतरले असून, सभा, रोड शो, पदयात्रा, कार्नर सभा आणि घरोघरी संपर्क मोहिमा यामुळे शहरांचा कानाकोपरा राजकारणाने व्यापलेला दिसतोय. अशा निर्णायक टप्प्यावर मुंबई महापालिका निवडणुकीसाठी



भाजपकडून तयार करण्यात आलेले प्रचार गीत राज्य निवडणूक आयोगाने नाकारल्याची माहिती समोर आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपने विशेष प्रचार गीत तयार केले होते. मतदारांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी आणि भावनिक अपील निर्माण करण्यासाठी संगीत, शब्द आणि प्रसिद्ध कलाकारांचा वापर करण्याची रणनीती भाजपने आखली होती. त्यानुसार हे गीत तयार करण्यात आले होते आणि प्रचाराच्या अंतिम टप्प्यात ते मोठ्या प्रमाणावर वापरण्याचा पक्षाचा मानस होता. मात्र, प्रचाराला गती मिळण्याआधीच या गीतावर निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आणि प्रचारासाठी वापरण्यास नकार दिला.

या प्रचार गीतामध्ये 'भगवा' हा शब्द वापरण्यात आल्याने निवडणूक आयोगाने आक्षेप नोंदवला आहे. निवडणूक आचारसंहितेच्या निकषांनुसार धार्मिक किंवा भावनिक स्वरूपाचे शब्दप्रयोग प्रचारात आक्षेपार्ह ठरू शकतात, असा ठपका ठेवत आयोगाने हे गीत नाकारले असल्याची माहिती आहे. आयोगाच्या मते, अशा शब्दप्रयोगामुळे मतदारांवर विशिष्ट भावनिक किंवा धार्मिक प्रभाव पडू शकतो, जो निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेला बाधा आणणारा ठरू शकतो. त्यामुळे भाजपला हे गीत प्रचारात वापरण्यास परवानगी देण्यात आलेली नाही.

# हिदायत पटेल यांच्यावर चाकूने प्राणघातक हल्ला

**अकोला : (समर्थ गांवकरी)**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर मोहाळा (ता. अकोट) येथे एका प्रार्थना-स्थळाजवळ जीवघेणा हल्ला झाल्याची घटना मंगळवारी ६ जानेवारीला दुपारी घडली. जीवघेण्या हल्ल्यात पटेल यांच्या पोटावर, मानेवर चाकूने वार केले. हल्ल्यानंतर जखमी अवस्थेतील हिदायत पटेल यांच्यावर अकोट येथे प्राथमिक उपचार करुन त्यांना अकोला येथे पुढील उपचारासाठी हलवण्यात आले आहे. अकोला येथील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती गंभीर आहे.

गावातील राजकीय पूर्व वैमनस्यातून एका गटाकडून हा हल्ला झाल्याचे ग्रामस्थ व पोलिसांचे म्हणणे आहे.



भाजप अल्पसंख्याक सेलचे दिवंगत कार्यकर्ते मतीन पटेल यांच्या गटाने पूर्ववैमनस्यातून हा हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे. मतीन पटेल यांचा पुतण्या उबेद पटेल याने हा हल्ला केला. याप्रकरणी उबेद पटेलला एलसीबी पथकाने पणज येथून ताब्यात घेतले.

२४ मे २०१९ रोजी लोकसभा निवडणुकीदरम्यान मोहाळा येथे भाजप अल्पसंख्याक सेलचे माजी पदाधिकारी मतीन शेरखाँ पटेल (५८) यांची हत्या झाली होती. या प्रकरणी हिदायत पटेल यांच्यासह दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून, त्याची सुनावणी सुरू आहे. त्यामुळे आपल्या काकाच्या हत्येचा बदला घेण्याच्या उद्देशातून हिदायत पटेल यांच्यावर मृत मतीन पटेल यांचा पुतण्या उबेद पटेल याने चाकूने हल्ला केल्याची घटना घडल्याची माहिती गावातील काही प्रत्यक्षदर्शींकडून मिळाली. आमचा त्या दिशेने तपास सुरू आहे, असे अकोट पोलिसांनी सांगितले.

# कमळाची काळजी तुम्ही घ्या

## पुढील पाच वर्षे तुमची काळजी आम्ही घेऊ – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

येणाऱ्या १५ जानेवारी रोजी कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून भारतीय जनता पार्टीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून द्या. कमळाची काळजी तुम्ही घ्या, पुढील पाच वर्षे तुमची काळजी आम्ही घेऊ, असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरातील स्व. इंदिरा गांधी मैदानावर आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गुपछडे, आमदार श्रीजया चव्हाण, तुषार राठोड, भीमराव केराम, राजेश पवार, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकतराव हंबर्डे, महानगराध्यक्ष चैतन्य बापू देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक शीतल खंडीला यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मागील ७० वर्षांत शहरी जनतेसाठी स्वतंत्र आणि ठोस विकास योजना तयार झाल्या नाहीत. शहरांमध्ये वाढती लोकसंख्या, झोपडपट्ट्या, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि गटार यांसारख्या समस्या निर्माण झाल्या. मात्र २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शहरांच्या विकासासाठी अमृत योजना, प्रधानमंत्री आवास योजना यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात आल्या.

नांदेड शहरासाठी हजारो कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून झोपडपट्टी धारकांना त्यांच्या जागेवरच मालकी हक्क देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. कच्च्या घरात राहणाऱ्यांना पक्के घर बांधण्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शहरातील भूमिगत गटार योजनेसाठी ३५१ कोटी रुपये, पाणीपुरवठ्यासाठी १६८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. कचऱ्यावर प्रक्रिया करून स्वच्छ नांदेड घडविण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. समृद्धी महामार्गाला नांदेड जोडण्याचा प्रयत्न सुरू असून त्यामुळे औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## दोन वर्षांच्या चिमुकल्यासह पित्याची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या ; दहेली परिसर हादरला

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील दहेली (ता. किनवट) परिसरात दोन वर्षांच्या चिमुकल्यासह एका तरुण पित्याने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडल्याने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेत विक्रम सुरेश मारशेटवार (वय ३०) व त्यांचा दोन वर्षांचा मुलगा शिवाजी विक्रम मारशेटवार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

ही घटना ५ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजेपासून ते ६ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान घडल्याचे प्राथमिक तपासातून स्पष्ट झाले आहे. दहेली येथील रहिवासी असलेले विक्रम मारशेटवार यांनी आपल्या दोन वर्षांच्या मुलासह गावालगत असलेल्या राजेश संटी दिसलवार यांच्या शेतातील विहिरीत उडी घेऊन जीवन संपविल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

> या दुर्दैवी घटनेमुळे दहेली व परिसरात शोककळा पसरली असून, दोन वर्षांच्या चिमुकल्यासह पित्याने टोकाचा निर्णय घेतल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सकाळी या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच सिंदखेड पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. विहिरीतून दोन्ही मृतदेह बाहेर काढून पंचनामा करण्यात आला.

या प्रकरणी सिंदखेड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, ठाणेदार रमेश जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार संतोष कोंडापेल्लीवार पुढील तपास करीत आहेत. दोन्ही मृतांचे शवविच्छेदन दहेली तांडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दुपारी १२.३० वाजता करण्यात आले. शवविच्छेदन उमरी बाजार येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. पुरुषोत्तम आईटवार यांनी केले असून, वैद्यकीय अधिकारी ओमप्रकाश थोटे यांनी सहकार्य केले.

शवविच्छेदनानंतर दोन्ही पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. मृत विक्रम मारशेटवार यांच्या पश्चात आई व दोन भाऊ असा परिवार आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, मृताची पत्नी सध्या माहेरी राहत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

## प्रा. रामदास तांबे यांना पुरस्कार प्रदान

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतूर. ता:-जुन्नर येथील रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलचे विश्वस्त, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक तसेच अनेकांचे प्रेरणास्थान असलेले रामदासजी तांबे.यांना काव्यमित्र प्रकाशन संस्था,डेक्कन,पुणे यांच्या वतीने" राष्ट्रीय जीवन गौरव "पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शिक्षण व साहित्य क्षेत्रात केलेल्या दीर्घकालीन, निष्ठावंत व मोलाच्या कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. प्रा. तांबे सरांचे लेखन म्हणजे शब्दांची कलात्मक गुंफण असून, प्रत्येक प्रसंगाला साजेसे असे त्यांचे लेखन वाचकांच्या मनाला स्पर्श करून जाते.त्यांच्या लेखनात जीवनमूल्ये, सामाजिक भान व सकारात्मकतेचा सुगंध अनुभवास येतो. शिक्षक, परीक्षक, मार्गदर्शक व साहित्यिक अशा विविध भूमिकांतून त्यांनी समाजाला दिलेले योगदान उल्लेखनीय आहे.अशी ज्ञानसमृद्ध 'ज्ञानगंगा' प्रत्यक्ष रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूलमध्ये अखंडपणे प्रवाहित होत असल्याचा सार्थ अभिमान शाळा परिवारास आहे.कोणतेही मोठे यश हे अथक परिश्रम, सातत्य आणि समर्पणातूनच मिळते, याची प्रचिती या सन्मानामुळे येते. या राष्ट्रीय पातळीवरील गौरवामुळे ओतूर परिसरासह शिक्षण व साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रा. रामदासजी तांबे सर यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. सरांच्या पुढील वाटचालीस रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल ओतूरच्या वतीने मानाचा मुजरा.




## निवृत्ती पिरताजी उगले यांचे निधन!

**डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)**



डोंगरगाव येथील निवृत्ती पिरताजी उगले यांचे दिनांक 1 जानेवारी २०२५ रोजी वयाच्या 92 व्या वर्षी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, सुना, नातू, पतवंडे व जावई असा मोठा परिवार आहे. संदीप कचरू उगले,प्रमोद कचरू उगले,प्रदीप कचरू उगले यांचे आजोबा होत. डोंगरगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांचा दशक्रिया विधी शनिवार दिनांक 10 जानेवारी 2026 रोजी शैनेश्वर व भोलेश्वर आश्रम, डोंगरगाव येथे होणार असून, याप्रसंगी व्यंकटेश महाराज सोनवणे यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे.

## कंधारच्या उरुसात राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन

### संदल मिरवणुकीत हजारो हिंदू-मुस्लिम बांधव सहभागी

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

शहरातील हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेल्या प्रसिद्ध सूफी संत हजरत हाजी सय्याह सरवरे मगदूम सय्यद सईदोद्दिन रफाई रहेमतुल्ला अलय यांच्या ७११ व्या उरुसानिमित्त मंगळवारी सायंकाळी काढण्यात आलेल्या संदल मिरवणुकीत हजारो हिंदू-मुस्लिम बांधवांनी सहभाग घेत राष्ट्रीय एकतेचे दर्शन घडविले.

हजरत हाजी सय्याह यांचा दर्गा एक जाज्वल्य देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. उरुसानिमित दर्गाच्या दर्शनासाठी हजारो भाविक-भक्त कंधारला हजेरी लावतात. जिल्हाधिकाऱ्यांकडून सुटी जाहीर करण्यात येत असल्याने उरुसाला भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. महाराष्ट्रासह शेजारील आंध्र, कर्नाटक, तेलंगणातही हाजी सय्याह यांना मानणारा वर्ग असल्यामुळे तेथील भाविक भक्तही उरुसाला दर्गामध्ये येऊन श्रद्धासुमने वाहतात.




मंगळवारी सायंकाळी पाचला फातेहाखाणीनंतर सज्जादा नशीन सय्यद शाह मूर्तुजा मोहियोद्दिन हुसैनी व मुतवली सय्यद शाह मुजतबा मोहियोद्दिन हुसैनी यांच्या मार्गदर्शनाखाली व उरूस समितीचे अध्यक्ष जफरोद्दिन बाहोद्दिन यांच्या नेतृत्वाखाली दर्यामधून संदल मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. वाजतगाजत ढोल-ताशांच्या गजरात ही मिरवणूक भाविक भक्तांसह मार्गस्थ झाली.

शहरातील मुख्य मार्गावरून मार्गस्थ होत भाविक-भक्तांना दर्शन देत मिरवणूक रात्री उशिरा दर्गा येथे पोचली. मिरवणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## फुलवळ पत्रकार संघाकडून वृक्षारोपण करून दर्पण दिन साजरा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

मराठी पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाणारे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून ६ जानेवारी हा पत्रकार दिन म्हणून सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्याच प्रमाणे कंधार तालुक्यातील फुलवळ मराठी पत्रकार संघानेही तो आज मोठ्या उत्साहात साजरा करतांना वृक्षारोपण करून बाळशास्त्री जांभेकर यांना नम्रपूर्वक अभिवादन केले.

नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात पहिले पत्रकार भवन निर्माण केलेल्या फुलवळ पत्रकार संघाकडून हा पत्रकार दिनाचा सोहळा सरपंच प्रतिनिधी नागनाथराव मंगनाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रथमतः दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार होताच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने संपूर्ण पत्रकारांचा शाल , पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.



फुलवळ पत्रकार संघाकडून याच जि . प. कें. प्रा. शाळेच्या आवारात अनेक रोपट्यांचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले व एकजुटीचा सामुदायिक संकल्प करत निर्भीड पत्रकारिता करतांना लेखणीच्या माध्यमातून गरजू , उपेक्षित , वंचितांना न्याय मिळवून देत गाव व समाज विकासासाठी सकारात्मक बातम्या छापून लेखणीची धार कायम तेज ठेवत पत्रकारितेवरील विश्वासार्हता कायम ठेवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा संकल्प ही करण्यात आला .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे सल्लागार डॉ. प्रदीपसिंह राजपूत यांनी केले तर पत्रकार विश्वांभर बसवंते यांनी आपल्या मनोगतातून फुलवळ पत्रकार संघाच्या कार्याचा आढावा मांडला. सूत्रसंचालन वीरभद्र मठपती यांनी तर आभार के. एच. पांचाळ यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक कामजी मंगनाळे , गवळे सर , पुराणिक मॅडम , गवळे मॅडम , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष परमेश्वर फुलवळे , उपाध्यक्ष आखिल निचलकर , माजी अध्यक्ष मंगेश पांचाळ व त्यांचे सर्व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

## मतदान केंद्राचा आढावा

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूकी साठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे त्याअनुषंगाने मुख्य निवडणूक निरीक्षक नतिशा माथूर व उपयुक्त गिरीश कदम यांनी सोमवारी सिडको परिसरातील विविध मतदान केंद्राना भेट देऊन पाहणी करून आढावा घेतला. मुख्य निवडणूक निरीक्षक नितीशा माथुर यांनी निवडणूक प्रक्रिया सुरळीत व काटेकोर पध्दतीने पार पाडण्यासाठी त्यांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय 6 अंतर्गत असलेल्या मतदान केंद्र शिवाजी विद्यालय सिडको व कसुमताई महाविद्यालय सिडको येथे पहाणी केली , यावेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपायुक्त गिरीश कदम शहर अभियंता सुमंत पाटील ,कनिष्ठ अभियंता किरण सुर्यवंशी, जयदीप महाजन यांच्या सह सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग,बिएलओ,कर निरीक्षक, संबंधित शाळेचे मुख्याध्यापक व कर्मचारी यांच्यी उपस्थिती होती.

## पोलीस स्थापना दिनानिमित्त ग्रामीण पोलीस स्टेशन येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस स्टेशन येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते , यावेळी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या वतीने पोलीस स्टेशन येथील विविध कामकाजाची माहिती देण्यात आली.

पोलीस स्थापना दिनानिमित्त पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीतील काकांडी येथील युवा मिलिटरी अकॅडमी येथे दि 5 जानेवारी रोजी बारावी उत्तीर्ण बेरोजगार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ,यात पोलीस भरती विषयक नियम व तरतुदी बाबत दुय्यम पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे व प्र.पोलीस उपनिरीक्षक स्वप्रिल सोळंके यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

तर पोलिस स्टेशन येथे शिवाजी विद्यालय येथील एन. सी. सी.च्या विद्यार्थ्यांना कामकाजाची माहिती देऊन शस्त्र कशी चालविण्यात येते याचे प्रशिक्षण देण्यात आले, यावेळी पोलीस अंमलदार व एन.सी. सीचे शिक्षक भोसीकर यांची उपस्थिती होती.

## गोर गरीबांची लढाई इमानदारीने लढतो आहे : मनोज जरांगे

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

आज ह्या संतांच्या व्यासपीठावरून सांगतो की , आम्ही साधुसंतांना वारकरी संप्रदायाला मानतो . आम्ही जातिवादाची लढाई लढत नसून गोरगरिबांच्या लेकराची लढाई लढत असल्याचे संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी गुरुवारी (दि १) सिन्नर तालुक्यातील पांगरी येथे छावा भारत क्रांती मिशन चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्ताने आयोजित कार्यक्रमात बोलताना सांगितले. यावेळी व्यासपीठावर शिवाजीराजे जाधव शिंदखेडा, राष्ट्रीय प्रवक्ता सिंहस्थ कुंभमेळा नाशिक महंत डॉ भक्तीचरण दास महाराज ,जगद्गुरु द्वाराचार्य विद्यावाचस्पती डॉ रामकृष्णदास महाराज लहवितकर ,



श्री श्री १००८ महामंडलेश्वर शनिभक्त सुकदेव महाराज वाकी, श्री श्री जगद्गुरु शांतिगिरीजी महाराजाचे प्रतिनिधी जनेश्वर महाराज, पुणे येथील उत्तमराव मांढरे, भिवंडी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर स्थापन करणारे राजाभाऊ चौधरी,छावा मराठा संघटनेचे संस्थापक किशोर भाऊ चव्हाण, छावा भारत क्रांती मिशन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर, मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील, परमेश्वर नलावडे पाटील, सिन्नर कृषी उत्पन बाजार समिती माजी सभापती रमेश आप्पा पांगारकर, उद्योजक विजय काकडे पुणे आदी संह साधू महत विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोज दादा यांनी डॉ विलासभाऊ पांगारकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सांगितले की विलास भाऊ हे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व समाजाचे कार्य महाराष्ट्राच्या बाहेर मोठ्या प्रमाणात समाजाला एकत्र करण्याचे काम करत आहे आहेत. भाऊंनी बोलवले आणि आम्ही आलो नाही असे कधीच झाले . ज्या प्रमाणे भाऊ दिलेला शब्द मोडत नाही. तसेच आम्ही हातात घेतलेले काम पूर्ण केल्याशिवाय थांबत नाही . एका वर्षात समाजाला आरक्षण देऊ यासाठी काम सुरू आहे. आचारसंहितेचा आडसर येत आहे . मात्र लवकरच आरक्षणाचे काम पूर्ण करणार असल्याचे जरांगे यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, विलास भाऊंनी जे पेरले ते आता दिसत आहे. हिच आयुष्याची शिदोरी आहे. ज्याप्रमाणे आम्हाला आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला देता. तसाच आम्ही त्यांना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला देतो .

यावेळी उपस्थित मान्यवरांनी छावा भारत क्रांती मिशन वर्धापन दिन व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलास भाऊ पांगरकर यांना वाढदिवसाच्या सदिच्छा दिल्या.

यावेळी साधू महंत, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय ,सामाजिक, उद्योजक आदि मान्यवरांचा छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव पुरस्काराने मान्यवरांचा हस्ते सन्मानित करण्यात आले.

डॉ विलास भाऊ पांगारकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की माझ्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्ताने आलेल्या सर्वांचे आभार मानतो. छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास हा नुसता महाराष्ट्र पुरता नसून संपूर्ण देशाला जगाला कळवा. यासाठी छावा भारत क्रांती मिशन मिशनच्या माध्यमातून राष्ट्रीय शिवजयंती हे गेल्या 30 वर्षापासून विविध राज्यामध्ये साजरी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती ही देशाची राजधानी दिल्लीमध्ये गेल्या तीन वर्षापासून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहेत. या शिवकार्यासाठी आम्हाला विविध राज्यातील देशातील लोक जोडले जात आहेत. येणारी 19 फेब्रुवारी 2026 राष्ट्रीय शिवजयंती ही जगन्नाथ पुरी ओडिसा येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने मोठे असे नियोजन करण्यात येत आहे. हजारो चार चाकी वाहनेद्वारे मोठी अशी रथ यात्रा ही जगन्नाथपुरी येथे नेण्यात येत येणार आहे .यासाठी साधू महंत शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.

आज संघटनेचा वर्धापन दिन , माझा वाढदिवस आणि राष्ट्रीय शिवजयंती आढावा बैठक ह्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी आलेले संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे आणि कुंभमेळ्याचे राष्ट्रीय प्रवक्ते भक्ती चरणदास महाराज, डॉ रामकृष्णदास लहवितकर महाराज, श्री श्री महामंडलेश्वर शनिभक्त सुखदेव महाराज, जनेश्वर महाराज, आमच्या सोबत कायम असणारे शिवाजी राजे जाधव , किशोर चव्हाण, काकडे पाटील, परमेश्वर नलावडे यांच्यासह व्यासपीठावरील सर्व मान्यवर उपस्थित असलेल्या सर्व जनसमुदाय , पांगरी गावचे ग्रामस्थ , पत्रकार बांधव भगिनींचे मनापासून आभार मानतो.

छावा भारत क्रांती मिशन मुख्य समन्वयक विजय काकडे पाटील व परमेश्वर नलावडे पाटील यांनी राष्ट्रीय शिवजयंती जगन्नाथ पुरी ओडिसा 19 फेब्रुवारी 2026 याविषयी सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

माणुसकीचे दर्शन डॉ. विलास भाऊ पांगरकर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने घोटेवाडी येथील एका कुटुंबातील कर्त्या पुरुषाचे दुःखद निधन झाले होते. पत्नी व ६ मुली असलेल्या कुटुंबाला माणुसकीच्या नात्याने प्रत्येक मुलीला 51 हजार रुपयांचे चेकचे वितरण मनोज दादा जरांगे पाटील व उपस्थित साधू महंतांच्या उपस्थितीत ६ मुलींच्या आईकडे चेक सुपूर्द करण्यात आले. यावेळी डॉक्टर पांगरकर यांच्या पत्नी सौ छाया पांगरकर या उपस्थित होत्या. दैनिक समर्थ गांवकरी नाशिक जिल्हा प्रतिनिधी व सा.आपला आवाज संपादक अमोल सोनवणे यांचा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# बाळशास्त्री जांभेकर यांची 'दर्पण'च्या माध्यमातून मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ – डॉ. विश्वासराव आरोटे

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या वृत्तपत्राच्या माध्यमातून मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली. समाजाला विचार करायला लावणारे प्रभावी माध्यम त्यांनी निर्माण केले, म्हणूनच ते 'दर्पणकार' म्हणून ओळखले जातात, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी केले. अकोले येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन भाजपचे जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास



भाजपा तालुका सरचिटणीस मच्छिंद्र मंडलिक, भाजपा सोशल मीडिया सेलचे जिल्हा संयोजक भाऊसाहेब वाकचौरे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी आघाडीचे तालुका अध्यक्ष संजय फुलसुंदर, पत्रकार हल्ला विरोधी समितीचे अध्यक्ष संतोष साळवे, शेतकरी नेते शिवाजी नाईकवाडी, सुरेश शिंदे, साहेबराव देवकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी वृत्तपत्र सुरू करणे ही अत्यंत धाडसी बाब होती. अशा कठीण काळात बाळशास्त्री जांभेकरांनी पत्रकारितेचे दीप प्रज्वलित केले, हे मराठी समाजाचे मोठे भाग्य आहे. भाजपचे जिल्हा सरचिटणीस सिताराम भांगरे यांनी पत्रकारितेला लोकशाहीचा चौथा स्तंभ संबोधत निर्भीड व निष्पक्ष पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले. सामान्य जनतेला न्याय देण्याचे कार्य पत्रकार सातत्याने करीत असतात. अकोले तालुक्यातील पत्रकारांनी या मूल्यांची जपणूक करावी, तसेच नव्या पत्रकारांनी ज्येष्ठांचा आदर्श घेऊन प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये कार्य करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे यांनी केले. सूत्रसंचालन अमोल पुंडे यांनी तर आभार प्रदर्शन निखिल भांगरे यांनी केले.

> "दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मगावी महाराष्ट्र मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन साजरा केला जाणार आहे."
> **– डॉ. विश्वासराव आरोटे**

# महात्मा फुले, सावित्रीबाई यांना मानवंदना



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागातील आदिवासी पेसा ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खटकाळे येथे आद्य शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती, तसेच 'बालिका दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले यांची वेशभूषा परिधान करून स्त्री शिक्षणाचा जागर करत विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या कार्याला उजाळा दिला.

आर्यन गागरे या विद्यार्थ्याने महात्मा ज्योतिराव फुले व तेजस्विनी गागरे या विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांची यांची वेशभुषा केली होती.आरुषी मोरे, राखी सांगडे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित एक नाटिका सादर केली. मुख्याध्यापिका मनीषा काशीद यांनी मनोगत व्यक्त केले. श्री. दिपक मुंढे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिताराम गागरे, उपाध्यक्ष हिना शेख,सुमित्रा गागरे, हिराबाई भवारी, अर्चना मोरे,सुवर्णा मोरे,योगेश मोडक, अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते.

# महिलांसाठी जागर आरोग्याचा व कार्यशाळा संपन्न



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

चाईल्ड फंड इंडिया,पंचायत समिती जुन्नर, प्राथमिक आरोग्य केंद्र,मढ,गौरीशंकर सामाजिक प्रतिष्ठान, हाय स्पीड स्किल हब, मराठा चेंबर्स प्रतिष्ठान अँड एग्रीकल्चर तसेच ग्रामपंचायत कोपरे यांच्या संयुक्त सहकार्याने महिलांसाठी एकदिवसीय मोफत डिजिटल मार्केटिंग कार्यशाळा व मोफत उद्यम आधार वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यशाळेत साधारणपणे ५५ महिलांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवण्यात आला.तसेच, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,कोपरे येथील ३५ विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य (एज्युकेशनल मटेरियल) वाटप करण्यात आले. याच उपक्रमाअंतर्गत गावातील नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजनकरण्यात आले.या शिबिरामध्ये आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या तसेच नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले.

सदर कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थितीमध्ये पंचायत समिती जुन्नर येथील कोपरे गावचे ग्रामसेवक तुषार साबळे,पेसा विस्तार अधिकारी तुकाराम लोहकरे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व चाईल्ड फंड इंडिया संस्थेचे ब्रँड अँबेसिडर रविंद्र भोर,चाईल्ड फंड इंडिया सीनियर प्रकल्प अधिकारी अभिजीत मदने,डॉ.सचिन खेडकर वैद्यकीय अधिकारी,मुथाळणे,डॉ.अतुल शिनारे समुदाय आरोग्य अधिकारी, सांगणोरे,गजानन भोईर:-आरोग्य सहाय्यक मढ,आरती कुमकर,आशा जिवणे,सुरेखा राहणे,सुरेखा दिघे,विजय हुरेज,तुकाराम ठोंगिरे ,कोपरे व मुथाळणे येथील सर्व आशा सेविका,ग्राम पंचायत कर्मचारी अमोल देठे.दत्तू मुठे,ग्रामपंचायत सदस्य नंदा मुठे,युवा कार्यकर्ते शंकर माळी,ग्रामसंघ सचिव वनिता माळी, सर्व बचत गटांचे अध्यक्ष व सचिव तसेच सरपंच रोहिणी माळी यांची उपस्थिती लाभली. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मंगेश आतकर,रामदास दाभाडे व विश्वास गालफाडे यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडली.त्यामुळे सदर उपक्रम यशस्वी ठरला.

# इराणी चोरट्यांचे चोरीचे मार्ग उघड

**मोहने: (समर्थ गांवकरी)**

गेल्या दोन वर्षापासून कल्याणनजीक असलेल्या आंबिवलीतील इराणी वस्तीत भामट्यांनी कल्याणसह ठाणे जिल्ह्यातच नव्हे तर मुंबई,नवी मुंबई आणि थेट कर्नाटक राज्यात चोरीसाठी प्रवेश केला.इराणी चोरट्यांचे चोरीचे मार्ग आज पर्यंत पोलिसांनाही चक्रावून टाकतात. नुकताच इराणी वस्तीत मुंबईतील पोलिसांवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली होती.आता मात्र या भामट्यांचा धुमाकूळ वाढल्याचे लक्षात येत आहे.बतावणी आणि जबरदस्तीत महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि सोनसाखळ्या लंपास करणाऱ्या सराईत इराणी चोरट्यांना ठाणे शहर पोलिसांनी गजाआड केले आहे. कल्याण-आंबिवली येथील कासिम गरिबशहा इराणी (38) आणि मुख्तार शेरू हुसेन उर्फ इराणी (32) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

# बीदरमध्ये भाजपा आमदार व काँग्रेस MLC आमनेसामने

**बीदर : (समर्थ गांवकरी)**

बीदर जिल्ह्यातील कर्नाटक डेव्हलपमेंट प्रोग्राम (KDP) अंतर्गत आयोजित बैठकीत सोमवारी (५ जानेवारी २०२६) मोठा राजकीय गोंधळ उडाला. हुमनाबाद मतदारसंघाचे भाजपा आमदार सिद्धू पाटील आणि काँग्रेसचे विधानपरिषद सदस्य (MLC) भीमराव पाटील यांच्यात जोरदार शाब्दिक वाद झाला. हा वाद इतका टोकाला गेला की दोघेही जवळपास एकमेकांवर धावून जाण्याच्या स्थितीत पोहोचले.



जिल्हा पंचायत सभागृहात पार पडलेल्या या बैठकीत भूमी विकास, वनजमिनीवरील अतिक्रमण आणि वस्ती विकास योजनांबाबतच्या प्रशासकीय कारवाईवरून मतभेद उफाळून आले. आमदार सिद्धू पाटील यांनी बैठकीदरम्यान काही भागातील सरकारी व वनविभागाच्या जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचा आरोप करत, प्रशासनावर निष्क्रियतेचा ठपका ठेवला. विशेषतः एका मोठ्या भूखंडाच्या वापरावर त्यांनी थेट प्रश्न उपस्थित केले.

त्यावर काँग्रेसचे MLC भीमराव पाटील यांनी या आरोपांना तीव्र विरोध करत, आमदारांच्या वक्तव्याला राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू झाले. काही क्षणांतच वातावरण तापले आणि वाद शाब्दिक मर्यादा ओलांडून जवळपास शारीरिक संघर्षाच्या टप्प्यावर पोहोचला.

बैठकीला उपस्थित असलेले वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि सुरक्षारक्षकांनी तत्काळ हस्तक्षेप करत दोघांनाही वेगळे केले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी बैठक काही काळासाठी स्थगित करावी लागली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात दोन्ही नेते आक्रमक भाषेत एकमेकांवर ओरडताना दिसत आहेत.

या घटनेनंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून, दोन्ही पक्षांच्या समर्थकांमध्ये चर्चांना उधाण आले आहे. कायदासुव्यवस्था बिघडू नये म्हणून प्रशासनाने सभास्थळी तसेच परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवला.

राजकीय विश्लेषकांच्या मते, विकासकामांच्या बैठकीत घडलेला हा प्रकार लोकप्रतिनिधींच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असून, प्रशासनिक चर्चांना राजकीय संघर्षाचे स्वरूप देण्यात येत असल्याची टीकाही व्यक्त होत आहे.

# सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

३ जानेवारी हा भारतीय स्त्रीशक्तीच्या अस्मितेचा, धैर्याचा आणि क्रांतीचा सुवर्णदिन ज्या काळात स्त्रियांनी उंबरठा ओलांडणे हे पाप समजले जायचे, अशा अंधकारमयी काळात ज्ञानाची ज्योत हाती घेऊन ज्या माऊलीने उभ्या स्त्रीजातीसाठी प्रगतीची दारे उघडली,त्या भारतीय स्त्री शिक्षणाच्या जननी, पहिल्या मुख्याध्यापिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आज जन्मदिन.त्यांच्या पावन स्मृतीस रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल,ओतूर, परिवारातर्फे विनम्र अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाईंचा प्रवास हा केवळ एका शिक्षिकेचा प्रवास नव्हता, तर तो एका महायुद्धासारखा होता..!! पुण्याच्या भिडेवाड्यात जेव्हा महात्मा जोतिराव फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली, तेव्हा सावित्रीबाईंनी शिक्षिकेची



जबाबदारी स्वीकारली.

शाळेत जात असताना लोकांनी त्यांच्यावर शेण फेकले,दगड मारले आणि शिवीगाळ केली.पण सावित्रीबाई डगमगल्या नाहीत.आपल्या पिशवीत दुसरी साडी नेऊन,शाळेत पोहोचल्यावर ती बदलून पुन्हा आनंदाने मुलींना शिकवणाऱ्या सावित्रीबाईंनी समाजातील अज्ञानाचा अंधार दूर करण्याचा विडा उचलला होता.केवळ शिक्षणच नव्हे, तर सामाजिक परिवर्तनसावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या, तर त्या एक थोर समाजसुधारक आणि संवेदनशील कवयित्रीही होत्या असे मुख्याध्यापक यांनी सांगितले.

यावेळी शाळेच्या महिला शिक्षकांनी संकल्प केला की क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल, ओतूर ही शपथ घेते की, ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला, विशेषतः मुलींना, दर्जेदार आणि संस्कारक्षम शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवणे हेच आमचे मुख्य ध्येय असेल.

# एकाच रात्री चार ठिकाणी चोरी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली शहरात काल एकाच रात्रीला चार ठिकाणी शेटर तोडून चोरी केल्याची घटना घडली आहे. दि. ५ जानेवारीच्या मध्ये रात्रीला नवीन बसस्थानक परिसरातील हायटेक एटीएम आणि भारतीय स्टेट बँक जवळील गजानन सेतू केंद्र , फोटो स्टोडिओ व जेठे बार शॉपीसह अन्य एका ठिकाणी चोरीची झाल्याचे संबंधित मालकांनी अज्ञात चोरा विरोध बिलोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. शहरात काल सोमवारच्या मध्ये रात्रीला अज्ञात चोरट्यांनी शेटर तोडून चोरी केल्याची घटना घडली आहे. यात नरसी, हैद्राबाद महामार्गावर असलेल्या भारतीय स्टेट बँक जवळील गजानन सेतू केंद्र व फोटो स्टुडिओचे शेटर तोडून मधील १ लाख रुपये किंमतीचा कॅनॉन कंपनीचा फोटो चॅमेरा, काही नगद रोकडसह ५० हजार रुपयाचे मौल्यवान किंमतीचे साहित्ये पळविले.

# सितेवाडी येथे हवामान स्टेशनचे लोकार्पण

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

शुक्रवार दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी शीतळेश्वर हायस्कूल, सितेवाडी येथे वेदर स्टेशनचे (Automatic Weather Station) उद्‌घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. सदर वेदर स्टेशनचे उद्‌घाटन पंचायत समिती,जुन्नर येथील गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे व चाईल्ड फंड इंडिया चे ब्रँड अँबेसीडर रविंद्र भोर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.हे वेदर स्टेशन चाईल्ड फंड इंडिया या संस्थेच्या माध्यमातून शाळेस देण्यात आले आहे.वेदर स्टेशन शाळेतस्थापित होण्यासाठी शीतळेश्वर हायस्कूलचे मुख्याध्यापक संतोष हांडे यांनी विशेष पाठपुरावा करून महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमास प्रमुख उपस्थित म्हणून जुन्नर पर्यटन विकासचे प्रमुख यश मस्करे, सितेवाडी



गावच्या लोकनियुक्त सरपंच दिपाली पाटेकर,चाईल्ड फंड इंडिया चे प्रकल्प व्यवस्थापक अभिजीत मदने, तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गवारी मिथुन मोजाड यांनीही उपस्थिती दर्शवली.या वेदर स्टेशनद्वारे तापमान,पर्जन्यमान,वाऱ्याचा वेग, विज रोधक व अति वारा यांसारखी हवामान विषयक माहिती अचूक व वैज्ञानिक पद्धतीने माहिती उपलब्ध होणार असून, त्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासासाठी तसेच हवामान बदलांविषयी जनजागृतीसाठी होणार आहे. अध्यक्षीय भाषणात अशोक लांडे यांनी तालुक्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांनी या वेदर स्टेशनला भेट देऊन त्याचा शैक्षणिक वापर करून अभ्यास करावा,असे आवाहन केले.

# डॉ. मृदुला कुमावत यांना पीएचडी पदवी प्रदान !

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

डॉ. मृदुला पांडुरंग कुमावत यांना कर्करोग निदान या विषयावर संशोधन केल्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदवीदान समारंभामध्ये पी. एच. डी. ही पदवी प्रदान केली आहे. विशेष म्हणजे डॉ. मृदुला कुमावत यांचे बी फार्मसी एम फार्मसीचे शिक्षण मुंबई विद्यापीठात पूर्ण झाले आहे. डॉ. मृदुला कुमावत यांना कर्करोग निदान या विषयाची पीएचडी करण्यासाठी डॉ. हेमंत उणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभल्याने डॉ. मृदुला कुमावत यांचे संशोधन पूर्ण झाले असून विशेष म्हणजे डॉ. मृदुला कुमावत या साऊथ आफ्रिका येथे वास्तव्यास असून त्यांनी केलेल्या या पीएचडीमुळे त्यांचे आपले माय भूमीशी नाते अखंड असल्याचे दाखवून दिले



आहे. त्यांच्या या यशाबद्दल पांडुरंग कुमावत, निर्मला कुमावत, गुलाबराव कुमावत, पुष्पा कुमावत, योगेश कुमावत ,दत्ता कुमावत ,आयुष कुमावत, अजिंक्य कुमावत, श्रद्धा कुमावत, व राहुरी येथील दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे राहुरी तालुका प्रतिनिधी राजेंद्र परदेशी व सुनंदा परदेशी यांनी डॉ. मृदुला कुमावत यांचे अभिनंदन केले आहे.

# सुरक्षित वाहतुकीसाठी नियमांचे पालन अनिवार्य!

## पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे; 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्वयंशिस्तीमुळे वैयक्तिक स्वातंत्र्यावर मर्यादा येत नसून, प्रत्यक्षात आपले रक्षण होत असते. वाहतूक सुरक्षा ही एक सामूहिक जबाबदारी असून, खरे सामर्थ्य वेगात नसून नियंत्रणात असते. हे तरुणांनी समजून घेतले पाहिजे आणि सुरक्षित वाहतुकीसाठी वाहतूक नियमांचे पालन करणे अनिवार्य आहे, असे प्रतिपादन पुणे परिमंडळ-५ चे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी केले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठात पोलीस वर्धापन दिन आणि रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित व्यसनमुक्ती व वाहतूक जनजागृती



कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाचे आयोजन एमआयटी एडीटी विद्यापीठ, हडपसर वाहतूक विभाग आणि लोणी काळभोर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

याप्रसंगी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनिता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., हडपसर वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र करणकोट, लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, विद्यार्थी कल्याण सहाय्यक संचालक डॉ. प्रतिभा जगताप, अधिष्ठाता डॉ. गणेश पाठक आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. यांनी विद्यार्थ्यांना जीवनात '३६०-डिग्री' दृष्टिकोनाचा अवलंब करण्याची गरज प्रतिपादित केली. सर्वसमावेशक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी स्वयंशिस्त ही पहिली गरज असून, स्वामी विवेकानंदांचे विचार आत्मसात करण्याचे आणि व्यसनमुक्तीसाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

### 'कम्युनिटी पोलिसिंग'मध्ये युवकांचा सहभाग आवश्यक!

अंतर्गत सुरक्षेसाठी 'कम्युनिटी पोलिसिंग' आवश्यक असून, पोलीस वर्धापन दिन सप्ताहादरम्यान तरुणांनी पोलिसांशी संवाद साधावा. पोलीस स्टेशनला भेट देऊन तेथील कार्यपद्धती समजून घ्यावी, तसेच वाहतूक व्यवस्थापनात स्वयंसेवक म्हणून काम करून पोलीस दलाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा, असे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सांगितले.

### ...अन्यथा तिसऱ्या गुरूंना यावे लागते

विद्यार्थ्यांच्या जीवनातील विविध पातळ्यांवर प्राप्त होणाऱ्या गुरूंची भूमिका अत्यंत मोलाची असते. आई-वडील हे आद्य गुरू, तर शाळा व महाविद्यालयातील शिक्षक हे दुसरे गुरू असतात. परंतु एखाद्याचे वर्तन खराब असेल आणि ते पहिल्या दोन गुरूंच्या नियंत्रणाबाहेर गेल्यास, तिसरे गुरू अर्थात पोलिसांना हस्तक्षेप करावा लागतो. त्यामुळे या गुरूच्या सान्निध्यात आले की कुठलाही शिष्य नक्कीच सुधारतो, अशी कोटी डॉ. शिंदे यांनी केल्यावर उपस्थितांमध्ये जोरदार हशा पिकला.

# रब्बी हंगामातील ई-पीक करण्यासाठी उरले अवघे 9 दिवस

- तलाठी मोठे यांच्या राहुरी प्रणित डांळीब संशोधन लखमापूर कृषी विद्यापीठला ई - पीक पाहणीची माहिती



चांदवड तालुका : (समर्थ गांवकरी)

रब्बी हंगामातील ई – पीक पाहणी राज्यस्तरावर १५ डिसेंबर पासून सुरुवात करण्यात आली होती. शेतकरी स्तरावर ई - पीक पाहणी करण्याची मुदत सुरुवातीला १५ जानेवारी पर्यत असून रब्बी हंगामातील ई - पीक करण्यासाठी उरले अवघे ९ दिवस शिल्लक राहिलेले आहेत. त्यानंतर ज्या शेतकऱ्याची पीक पाहणी करण्याची राहिलेली असल्यास त्यांना सहाय्यक स्तरावर पीक पाहणी करावी लागणार आहेत.

चांदवड तालुका प्रथम स्थानी असून तालुक्यात आतापर्यंत १०२८०३ पैकी शेतकर्यापैकी आतापर्यंत ४१६० इतक्या शेतकऱ्यानी क्षेत्र हे. ३२३५.१६ आर वर आणि बागलाण तालुक्यात आतापर्यंत १११११८ शेतकर्या पैकी आतापर्यंत २७३९ इतक्या शेतकऱ्यानी क्षेत्र हे. ३२३५.१६ आर इतकी पीक पाहणी नोंदविलेली आहेत. रब्बी हंगामात सर्वच सर्व शेतकरी शेती करू शकत नसले तरी ज्या ठिकाणी बागायत क्षेत्रावर व ज्या ठिकाणी पिकंसाठी पाण्याची सुविधा असलेया मोजक्याच क्षेत्रावर पीक घेतले जाते. बागलाण तालुक्याची ई - पीक पाहणी वाढविण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी लखमापूर दीपक मोठे विशेष प्रयत्न करीत असून पीक पाहणीची आकडेवारी वाढविण्यासाठी यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ ( राहुरी अंतर्गत ) डांळीब संशोधन आणि तंत्रज्ञान प्रसार केंद्र येथे भेट घेत संबधित शेताच्या बाधावर जात ई – पीक पाहणी करीत त्याचे महत्व समजून संगितले. तालुक्यातील लखमापूर येथील त्याचंबरोबर शेतकऱ्यांना पीक पाहणी शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली.



ठाणे : दिव्यात बी आर नगर जवळील सिद्धार्थ बुद्ध विहार येथे ख्यातनाम लोककवी दीनानाथ कांबळे यांच्या पत्नी ललिता कांबळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गित गायनाचा कार्यक्रम पार पडला. प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विकास इंगळे, डॉ.गाथा इंगळे, डॉ.देवेद्र कांबळे, रुपेश कांबळे यांनी उपस्थित राहून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहून समस्त कांबळे कुटुंबाचे सात्वन केले. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...

### मारोती घुमाळ, नारायण लुटे यांचा भाजपा पक्षात प्रवेश



नवीन नांदेड (स. गांवकरी) : असरजन येथील शिवसेनेचे माजी संघटक पदाधिकारी मारोती धुमाळ व कॉंग्रेस आय पक्षाचे सरचिटणीस नारायण लुटे यांनी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश केला. मनपा प्रभाग क्रमांक 19 मधील भाजपा पक्षाच्या उमेदवारांचा प्रचारासाठी 6 जानेवारी रोजी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी असरजन येथे बैठकीसाठी आले असता माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे,माजी नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेचे मारोती घुमाळ यांच्या सह नारायण लुटे यांनी भाजपा पक्षात प्रवेश केला यावेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. जुना कौठा,असरजन,धुमाळवाडी येथे खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या यावेळी विविध ठिकाणी भव्य स्वागत करण्यात आले.

### इंजि. पवनकुमार कांबळे यांच्या स्मरणार्थ मुलांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप

मुखेड (स. गांवकरी) : इंजि.पवनकुमार कांबळे यांच्या स्मरणार्थ शहरातील एक शांत, संयमी व सरळमार्गी जिवन जगणारे वार्ताहर अॅड.मिलिंद कांबळे व त्यांच्या परिवाराच्या वतीने मौजे आखरगा येथील माजी सरपंच माधवराव होनमाने पत्रकार रियाज शेख, पत्रकार अजित पवार, नारायणराव अमृतवार, तसेच भिमराव कांबळे येवतीकर यांच्या उपस्थितीत सोमवार दि.५/१ /२०२६ रोजी शहरातील यशवंतराव चव्हाण निवासी अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप करण्यात आले. निसर्गाने दिलेल्या अनमोल आयुष्यातील आठ ते नऊ वर्षे शिक्षणासाठी आपल्या परिवारापासून दूर राहून अतिशय जिद्द व मेहनतीने शिक्षण पुर्ण करून नोकरीच्या नंतर आपल्या परिवाराचा आधार बनण्याची आशा बाळगणारे इंजि.पवनकुमार कांबळे यांनी उच्च शिक्षणाची तपशा पुर्ण करतच starpari या नृत्यकला शिकवून तिच्या अंगी असलेल्या हरहुन्नरी कलेला वृद्धिंगत केले पण निसर्गाच्या आघातामुळे आपला परिवार सोडून अचानक या जगाचा निरोप घ्यावा लागला. अशा आपल्या गुणी सुपुत्राचे नाव अजरामर ठेवण्याच्या उद्देशाने वार्ताहर मिलिंद कांबळे यांनी ४ जानेवारी या आपल्या दिवंगत मुलाच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सोमवार दि.५/१/२०२६ रोजी शहरातील यशवंतराव चव्हाण निवासी अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व फळ वाटप करून एक सामाजिक उपक्रम राबवला. यावेळी सदर अपंग विद्यालयाचे संचालक चंद्रकांत घाटे बिल्लाळीकर यांचे सुपुत्र तथा संस्थेचे ट्रस्टी डॉ.संतोष घाटे, अधिक्षक देविदास बिजलीकर, शिपाई विजय बसवे, संतोष गवाले, माधव घाटे व मदतनीस रमाबाई गवलवाड यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालकांची उपस्थिती होती.



# पत्रकार हा लोकांचा आवाज आहे : ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव कांबळे

## दैनिक समर्थ गांवकरीचे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांचा रोटरी क्लब ऑफ नाशिक यांच्यावतीने सन्मान!

नाशिक : (समर्थ गांवकरी)




पत्रकार हा न्यायाचा तराजू असून समाजातील सामान्य, दीन-दुबळ्यांचे प्रश्न मांडण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकार प्रामाणिकपणे करत असतो. त्यामुळे पत्रकार हा लोकांचा खरा आवाज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव कांबळे यांनी केले.

मंगळवारी (दि. ६) रोटरी क्लब ऑफ नाशिक यांच्या वतीने पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर दैनिक सकाळ उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे संपादक अभय सुपेकर, रोटरी अध्यक्ष डॉ. गौरव सामनेरकर, रोटे मकरंद चिंधडे, रोटे रेखा पटवर्धन, अॅड. विदुलता तातेड, रोटे संतोष साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कांबळे म्हणाले की, २० वर्षांपूर्वीची पत्रकारिता वेगळी होती. त्या काळात लेखणीवर कोणाचाही दबाव पडू नये, याची विशेष काळजी घेतली जात होती. काळानुसार समाज बदलतो, तसेच पत्रकारिताही बदलली आहे. आज राजकीय आणि भांडवलदारांचे दडपण वाढले असले, तरी माध्यमे ही समाजाचा आवाज राहणारच आहेत. माध्यमांना सामान्य समाजाची ताकद आहे. बदल हा सतत होत राहणार आहे. समाजावर पत्रकारितेच्या नैतिकतेचा मोठा प्रभाव असतो.

सोशल मीडियाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, भविष्यात सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम ठरणार आहे. सोशल मीडियामुळे अनेक देशांत मोठे बदल झाले असून, काही ठिकाणी सरकारेही कोसळली आहेत. मात्र 'इनकमिंग-आऊटगोइंग' माहितीचा वेग वाढल्याने सोशल मीडियाचा वापर जपून करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी अभय सुपेकर यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारताना सुपेकर म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात देश घडवण्याचे महत्त्वाचे कार्य पत्रकारितेने केले आहे. आजची पत्रकारिता बदलली असली तरी समाजाचा विश्वासार्ह आरसा म्हणून वृत्तपत्रे आणि माध्यमे आपले कार्य करत आहेत. सोशल मीडियाला पूर्णपणे पत्रकारिता म्हणता येणार नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पत्रकारितेतील मूल्ये आजही शाश्वत आहेत. साडेतीन दशकांच्या प्रवासात मी घडलो असून, रोटरी क्लब नाशिकने दिलेला हा सन्मान माझ्यासाठी अभिमानास्पद आहे, असे त्यांनी नमूद केले.

याच कार्यक्रमात दैनिक समर्थ गांवकरी चे मुख्य संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांचाही सन्मान करण्यात आला. हा सन्मान समर्थ गांवकरीचे नाशिक प्रतिनिधी अमोल सोनवणे यांनी स्वीकारला.

कार्यक्रमात विविध दैनिकांतील माध्यम प्रतिनिधींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. रोटरी क्लब नाशिकचे सदस्य, माजी अध्यक्ष व अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॅलेंडरचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते प्रकाशन



नाशिक : (समर्थ गांवकरी)

नाशिक जिल्हा ग्राम महसूल अधिकारी संघ यांच्या कॅलेंडरचे उद्घाटन जिल्हाधिकारी यांच्या दालनात करण्यात आले. त्याचबरोबर दरवर्षी सालाबादप्रमाणे नवीन वर्षाच्या नवीन डायऱ्याची देखील प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी निळकंठजी उगले राज्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांच्या संपकल्पनेतून तयार केलेले नाशिक जिल्हा तलाठी संघाचे कॅलेंडर व नाशिक जिल्हा तलाठी पतपेढीच्या डायरीचे प्रकाशन व वितरण अप्पर जिल्हाधिकारी हेमांगी पाटील, प्रशासन तहसीलदार आबासाहेब तांबे, नाशिक जिल्हा अध्यक्ष संजय गाडे, नाशिक जिल्हा तलाठी पतपेढी चेअरमन बाबासाहेब खेडकर यांचे उपस्थितीत करण्यात आले. प्रसंगी सरचिटणीस अरुण फसाळे, उपाध्यक्षा प्रिती अग्रवाल, पतसंस्था सचिव मदन सोमवंशी, तालुका अध्यक्ष यादव बच्छाव, केदार भदाणे आधी सह इतर विभागातील अधिकारी उपस्थित होते.

# मराठी पत्रकारीताचे आद्य जनक : बाळशास्त्री जांभेकर

जामखेड : (समर्थ गांवकरी)



यांनी पत्रकारतेची मुहुर्त वेड रोवले समाज जागृती करने. अन्यया विरोधात आवाज उठवनयाचे वृत्तपत्र हे माध्यम निर्माण केले. वयाच्या विसाव्या वर्षी वृतपत्र काढने.. ते चालवने हे खुप दिव्य. काम होते..

जामखेड येथे. विश्व दर्शन नेट वर्क च्या वतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते मधुकर राळेभात आबा. हे उपस्थित होते.. या वेळी त्यांनी मनोगतामध्ये म्हटले की. पत्रकार हा समाजातील महत्वाचा घटक आहे. जागृक पत्रकार व समाजातील सजग नागरिक यांनी एकत्र येऊन काम केल्यास निश्चित समाजाचा विकास होऊ शकतो.. पत्रकारांच्या लेखनी मधे फार मोठी ताकद आहे.. निर्भीड पत्रकार समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करतात. सद रक्षणाः व खल निग्रणायः.. या ब्रिद समोर काम करत आहात. दिवस. रात्र अशी कोणतीही वेळ असो. कामात दिरंगाई करत नाहीत. लोक शाही जिवंत ठेवण्याचे काम पत्रकार करत आहेत.. हे काम अविरत चालू ठेवावे.. असि अपेक्षा व्यक्त करून आपले मनोगत संपवले.

या प्रसंगी जेष्ठ पत्रकार दत्तात्रय राऊत यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की.. पत्रकार समाजात काम करत असताना काही घटक नाराज होतात. काम करताना पत्रकारांना त्रास झाल्यावर समाजातील घटक पोटतिडकीने समोर येत नाही. पत्रकारां साठी पत्रकारांना च झगडावे लागते. ईतर घटक बसच्या भुमिका घेतात हे दुर्दैवी बाब आहे.. पत्रकारांना समाजातील सजग घटकांने तन मन धनाने सहकार्य केले पाहिजे...

या प्रसंगी पत्रकार. सर्व श्री गुलाबशेट जांभळे. अविनाश बोधले. पप्पु सय्यद. अशोक विर. अजय अवसरे. धनंजय पवार.. सुजीत धनवे. निलेश वनारसे. बाळासाहेब आरेकर. प्रदिप महारनवर आदी उपस्थित होते.

## घोषणापत्र / जाहीर नोटीस

प्रोसेस फी — नेमलेली तारीख : २८/११/२०२५
पान नंबर — दिनांक
अर्ज नंबर क्र /कावि/

**पारनेर येथील मे.तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात..**
**अर्जदार – अतुल पाराजी पाडळकर**
**सामनेवाले – कोणीही नाही...**

ज्याअर्थी अर्जदार यांची **मुलगी नामे आर्वी अतुल पाडळकर हिचा जन्म दिनांक ०६/०८/२०१९** रोजी मौजे **वेसदरे**, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथे याच मे. कोर्टाचे स्थळ सिमेत झालेला आहे. सदर अर्जदार यांनी या मे. कोर्टात जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्जदार यांची **मुलगी नामे आर्वी अतुल पाडळकर** हिचा **जन्म नोंद** ग्रामपंचायत **वेसदरे**, येथील सन **२०१९** चे जन्म – मृत्यू नोंदणी रजिस्टरला घेवून तसा **जन्माचा दाखला** अर्जदार यांना देण्याबाबत आदेश व्हावा, म्हणून सदर अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांची **मुलगी नामे आर्वी अतुल पाडळकर हिचा जन्म दिनांक ०६/०८/२०१९** रोजी मौजे **वेसदरे**, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथे झालेला आहे. याबाबत अथवा सदर अर्जाबाबत कोणाचे काही म्हणणे, हरकत तक्रार असल्यास त्यांनी या घोषणेच्या दिनांकापासून एक महिन्यात या न्यायालयात हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांचा पुरावा घेवून सदर अर्जाचा निकाल दिला जाईल व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत चालणार नाही.

आज दि. २८/११/२०२५ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**
**कामगिरी क्लर्क** — **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पारनेर**

# पत्रकार दिनाच्या कार्यक्रमाला पत्रकारांची दांडी

## संघटनेच्या शिस्तीवर जिल्हाध्यक्ष भगवान चंदे यांचा रोख!

ठाणे : (समर्थ गांवकरी)



मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेल्या दर्पणच्या स्मृतिदिनानिमित्त ६ जानेवारी २०२६ रोजी साजरा होणाऱ्या पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर, ५ जानेवारी २०२६ रोजी शहापूर तालुक्यातील घोडविंदे फार्म हाऊस, दहागाव येथे आयोजित कार्यक्रमाला अनेक पत्रकार मित्रांनी अनुपस्थिती दर्शवल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

हा कार्यक्रम पूर्वी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई संलग्न ठाणे जिल्ह्याच्या वतीने जिल्हा पदाधिकारी व तालुका अध्यक्षांचा सपत्नीक सत्कार आयोजित करण्यात आला होता. मात्र, वर्षभर ज्यांच्या बातम्या प्रसिद्ध केल्या जातात, किमान त्याच पत्रकारांना शुभेच्छा देण्यासाठीही काहींनी उपस्थित न राहणे, ही खेदजनक बाब असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, संघटनेमध्ये कोणालाही पगार किंवा निधी दिला जात नाही. स्वयंस्फूर्तीने, स्वतःच्या खर्चाची मानसिक तयारी ठेवूनच येथे काम करावे लागते. संघटनेचे महत्त्व न पटणाऱ्यांवर कोणतीही जबरदस्ती नाही; मात्र शिस्तभंग किंवा मनमानी वर्तन सहन केले जाणार नाही.

"ठाणे जिल्ह्यातील पत्रकारांच्या विश्वासावर मी सलग चार वेळा जिल्हाध्यक्ष पदावर कार्यरत आहे. त्या बहुसंख्य पत्रकार मित्रांचे तसेच राज्य कमिटीचे मी मनापासून आभार मानतो. माझ्यावर पक्षपातीपणाचा आरोप कोणी करत असेल, तर तो कदापि सहन केला जाणार नाही," असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

संघटनेतील पदनियुक्तीबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, तालुका पदासाठी किमान पाच सदस्य पत्रकारांचे पाठबळ आवश्यक असून, तालुका व जिल्हा पदाधिकाऱ्यांची निवड ही जिल्हाध्यक्ष व जिल्हा कमिटीमार्फत केली जाते. कोणताही अधिकृत पत्रकार सदस्य नियम, कर्तव्य आणि जबाबदारीचे भान ठेवून कोणत्याही पदावर नियुक्त होऊ शकतो, हीच संघटनेची लोकशाही परंपरा आहे.

भूतकाळातील उदाहरणे देताना त्यांनी सांगितले की, कल्याण तालुक्यात कोळी समाजातील जैतुदादा मुठोळकर, शहापूर तालुक्यात मुस्लिम समाजातील फैय्याज शेख, तसेच मुरबाड तालुक्यात शंकर करडे यांची निवड ही गुणवत्तेच्या आधारावर करण्यात आली होती. संघटना पत्रकारांचे हित, सामाजिक बांधिलकी आणि एकात्मता जपते, हे इतरत्र कितपत घडते, याची माहिती घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाची वेळ न पाळता मनमानी करणाऱ्या पदाधिकाऱ्यांबाबत गंभीर दखल घेऊन राज्य कमिटीला अहवाल सादर केला जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

शेवटी भगवान चंदे यांनी सांगितले की, संघटनेच्या जिल्हाध्यक्ष पदावर लोकशाही पद्धतीने कोणताही पात्र पत्रकार बसू शकतो. मात्र, संघटनेची प्रतिमा स्वच्छ राखणे आणि नियमांचे पालन करणे, ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न




जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग विद्यार्थी गुणवत्ता साठी मिशन आरंभ, शिष्यवृत्ती परीक्षा पूर्व तयारी जादा सराव परीक्षा, इस्रो शैक्षणिक सहल, बाल चित्रकला स्पर्धा, क्रीडा स्पर्धा तसेच विद्यार्थी कला गुणांना वाव देण्यासाठी विविध गुणदर्शन व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करते. अहिल्यानगर जिल्हा परिषद चे मुख्यकार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी ( प्राथ.) यांच्या अमूल्य मार्गदर्शन मुळे जिल्ह्यात गुणवत्ता पूर्ण शिक्षण बरोबरच विद्यार्थी च सृजनात्मक विकास होत आहे.

**- रामनाथ कराड, अधिक्षक शालेय पोषण आहार पंचायत समिती पाथर्डी.**

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

दि. ३ जानेवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खंडोबा माळ येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात आणि थाटात पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक करताना श्री रामनाथ कराड, अधिक्षक पी एम पोषण तथा शिक्षण विस्तार अधिकारी यांनी "पाथर्डी तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पाया प्राथमिक शिक्षणातूनच घडतो" असे नमूद केले. जिल्हा परिषदेतील शिक्षक विद्यार्थी विकासासाठी स्पर्धात्मक तयारीसह सातत्याने परिश्रम घेत असल्याचे त्यांनी गौरवोद्गार काढले. या स्नेहसंमेलनास पाथर्डी शहराचे नगराध्यक्ष श्री अभय आव्हाड यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री अमोल भैय्या गर्जे, सौ. दिपाली बंग व सौ. वर्षाताई मोरे हे सर्व नवनियुक्त नगरसेवक मान्यवर म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आरिफ बेग व श्री कौसे यांनी प्रभावीपणे पार पाडले. शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रमपूर्वक सुंदर असे स्नेहसंमेलन आयोजित केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी व पालकांनी समाधान व्यक्त करून कौतुक केले.कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपारिक कलेवर आधारित विविध सांस्कृतिक सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी मनोरंजक पद्धतीने प्रबोधनपर संवाद नाटिका, जुगलबंदी, तसेच पारंपारिक शेतकरी गीत, कोळी गीत आणि देशभक्तीपर गीते सादर करून सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश दिला. त्यांच्या सादरीकरणास उपस्थित मान्यवर, पालक व ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

# निवडणुकीत शिंदे शिवसेनेचे पारडे जड

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिवा शहरातील राजकीय वातावरणात प्रचाराचे ढग जमू लागले आहे. प्रभाग क्रमांक २७ मधील शिवसेनेचे शैलेश पाटील, दर्शना उमेश भगत, स्नेहा अमर पाटील व आदेश भगत हे मोठ्या मताधिक्याने विजयी होतील असा ठाम विश्वास जेष्ठ शिवसैनिक ब्रम्हाशेठ पाटील यांनी व्यक्त केला आहे. प्रचारा दरम्यान स्थानिक नागरिकांशी संवाद साधताना केलेल्या कामाची पोहचपावती असेल व दिवेकरांची देखील हीच भावना आहे हे स्पष्ट केले. दिवा प्रभाग क्र २७ मधील आपल्या कार्यकाळात दिवा शहरातील अनेक कामे व प्रश्न मार्गी लागले आहे. दिवेकर जनतेच्या अडीअडचणीला धावून जाणारे व सर्व सामान्यांसाठी सदैव तत्पर असलेले सर्व उमेदवार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. याच कामाची पावती म्हणून आज सर्वसामान्य नागरिक स्वतःहून त्यांच्या प्रचारासाठी रस्त्यावर उतरताना दिसत आहेत. दिव्यातील अनेक रस्त्यांचे काँक्रीटीकरण पूर्ण केले असून दिवा शहर पाणीटंचाईतून मुक्त करण्यासाठी नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम युद्धपातळीवर केले आहे. दिवा शहरासाठी अनेक नवनवीन योजना प्रलंबित असून लवकरच त्या मार्गी लागतील असे उमेदवार शैलेश पाटील यांनी काल बी आर नगर येथे प्राचारा दरम्यान सांगितले आहे.

# श्री आनंद महाविद्यालयामध्ये निर्भय कन्या अभियान शिबिर

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**




आजच्या या स्पर्धात्मक व आव्हानात्मक युगात विद्यार्थिनींनी आत्मनिर्भर, आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र व स्वसंरक्षणक्षम असायला हवे, असे प्रतिपादन डॉ. शेषराव पवार यांनी केले. विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले ,पुणे विद्यापीठ ,पुणे व श्री. आनंद महाविद्यालय पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने निर्भय कन्या अभियान श्री. आनंद महाविद्यालय मध्ये पार पडले. या शिबिराचे अध्यक्ष डॉ. शेषराव पवार यांनी शिबिराची उपयुक्तता विद्यार्थिनींना सांगितली. ते म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मिळेल त्या प्रत्येक गोष्टींतून विद्यार्थ्यांनी काहीतरी ज्ञान संपादन केले पाहिजे. आजची स्त्री ही आत्मनिर्भर होत आहे. त्याचा फायदा विद्यार्थीनींना भावी आयुष्यात निश्चित होतो.

निर्भय कन्या अभियान शिबिराचे पहिले पुष्प श्री. अंबादास साठे, कराटे प्रशिक्षक यांनी गुंफले व विद्यार्थिनींना कराटेचे प्रशिक्षण दिले. त्यांनी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी कराटेचे स्वसंरक्षणासाठी प्रात्यक्षिक दाखविले व सहभागी विद्यार्थिनींकडून करून घेतले. जर एखादी व्यक्ती अकस्मात हल्ला करत असेल तर त्यापासून कसा बचाव करायचा इत्यादी साध्या साध्या गोष्टीतून त्यांनी स्वसंरक्षणाचे धडे दिले. तसेच त्यांची विद्यार्थिनी ब्लॅक बेल्ट विजेती पायल हिने सर्व विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले.

शिबिराचे दुसरे पुष्प प्रा. डॉ . जयश्री खेडकर यांनी महिला सबलीकरण या विषयावर गुंफले.

आपल्या व्याख्यानात त्यांनी इतिहासातील तसेच पौराणिक महत्त्वाच्या स्त्रियांचे दाखले देत उदाहरणासहित महिला कशा बुद्धिमत्तेने आणि निर्णयक्षमतेने विकसित होत्या त्याचे विश्लेषण केले. निर्भिडपणे आपलं आयुष्य जगा, आत्मसन्मान जपा,आर्थिक साक्षर व्हा, असे प्रतिपादन श्रीमती खेडकर यांनी केले.

# माधुरी शिवराम लुटे यांचे निधन

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**



मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक शिवराम तुकाराम लुटे पाटील यांच्या सुविद्य पत्नी माधुरी शिवरामजी लुटे पाटील (वय ४६) यांचे अल्पशा आजाराने हैदराबाद येथील खाजगी रुग्णालयात मंगळवार, ता. ६ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने लुटे पाटील कुटुंबावर तसेच नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे.त्यांच्या पार्थिवावर बुधवार, ता. ७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता काळेश्वर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी व एक मुलगा असा परिवार आहे.

# सावित्रीबाई फुले महिला हॉलचे भव्य उद्घाटन

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



भिवंडी तालुक्यातील भादाणे ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आतकोली येथे जिल्हा विकास निधीतून बांधण्यात आलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला हॉलचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त मोठ्या उत्साहात पार पडले. या महिला हॉलमुळे ग्रामीण भागातील महिलांना विविध सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांसाठी स्वतंत्र व सुसज्ज व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या महिला हॉलचे उद्घाटन शिवसेना उपनेत्या ज्योतीताई ठाकरे व शिवसेना उपनेते विश्वासजी थळे यांच्या हस्ते तर शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाशजी भोईर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारे हे महिला हॉल महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे केंद्र ठरेल, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

उद्घाटनप्रसंगी प्र. सरपंच मेघा भोईर, सरपंच जोस्ना भालेकर, भास्कर माळी, रमेश शेलार, राजेंद्र काबाडी, प्रमिलाताई भोईर, संजयभाई पटेल, रुपेश कडूसकर, अनंता राऊत, सुरेंद्र शेलार, हरेश राऊत, मधुकर राऊत, मारुती शेलार, विजय भोईर, प्रदीप भोईर, संजय राऊत, संतोष शेलार, योगेश भोईर, रविंद्र पाटोळे, रवींद्र भोईर, संदीप महाराज भोईर, चिंतामण भोईर, रविंद्र निपुत्रे, नीरज निपुत्रे, राजाराम शेलार, मधुकर राऊत, कुणाल भोईर, महेश भोईर तसेच ग्रामपंचायत भादाणे सदस्य नितीन शेलार, वंदना काशिनाथ शेलार, दर्शना दिनेश ठाकरे, विमल रमेश वाघे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

या महिला हॉलमुळे गावातील महिलांना सभा, प्रशिक्षण, बचत गटांच्या बैठकांपासून ते विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज जागा उपलब्ध होणार आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या या हॉलमुळे महिला शिक्षण, सशक्तीकरण आणि सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला चालना मिळेल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# सुरेश खोसे पाटील यांना उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान




## मान नेतृत्वाचा, सन्मान पत्रकारितेतील कर्तृत्व व लेखनीचा

सुरेश खोसे पाटील हे जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून परिसरातील गोरगरीब , जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र झटणारे सामाजिक , पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेले निस्वार्थी व्यक्तिमत्व असून पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्य माणसाला माणूसकी च्या नात्याने मदतीचा हात पुढे करून समाजात एक आदर्श निर्माण केला.

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पत्रकारितेच्या लेखनीच्या माध्यमातून समाजातील दुर्लक्षित समस्या , प्रकाशात आणून त्या सोडविण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून करणारे पत्रकार सुरेश खोसे पाटील यांच्या लेखनी चे महाराष्ट्र राज्य सरपंच सेवा संघाने कौतूक करत दखल घेत त्यांना राज्यस्तरीय "उत्कृष्ठ पत्रकारिता पुरस्कार" श्री महंत डॉ . श्रीकांतदास धुमाळ यांच्या हस्ते व सरपंच सेवा संघाचे बाबासाहेब पावसे यांच्या अध्यक्षतेखाली आणि यादवराव पावसे , प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ . सुधा कांकरिया , प्रसिद्ध हिशेब तपासणीस डॉ . शंकर अंदानी , प्रसिद्ध सिने अभिनेत्री रुचिरा देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला .

पत्रकारांसाठी काम करत असलेला व त्यांना संघटीत पणे एकत्रित ठेवणारा देशातील सर्वांत मोठा असलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा नगर जिल्हा सचिव म्हणून कार्यरत असलेले व स्वतंत्र लेखनीसाठी प्रसिद्ध असलेले पत्रकार व दैनिक पारनेर समर्थ चे संपादक म्हणून कार्यरत असलेले सुरेश काशिनाथ खोसे पाटील यांच्या पत्रकारितेची व पत्रकार क्षेत्रातील योगदानाची राज्यातील गाव प्रमुख म्हणून कार्यरत असलेल्या व संवाद सरपंचांशी गावच्या केंद्र बिंदूशी या तत्वाने काम असलेल्या राज्य स्तरीय सरपंच सेवा संघाने आपण हून दखल घेत त्यांना व पारनेर तालुक्यातील एकमेव महिला पत्रकार म्हणून कार्यरत असलेल्या दैनिक पारनेर समर्थ च्या कार्यकारी संपादिका सौ . निलम खोसे पाटील यांना राज्यस्तरीय "उत्कृष्ठ पत्रकारिता पुरस्कार "सन्मानपूर्वक देत त्यांचा फेटा बांधत , सन्मान पत्र , सन्मान चिन्ह देऊन शाब्दिक गौरवपुर्ण वातावरणात व प्रमुख पाहुण्यांच्या आणि राज्यातील सरपंचांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला .

# कारवाईचा इशारा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**


किनवट शहर व परिसरात अल्पवयीन मुले वाहन चालवत असल्याचे प्रकार वाढत असल्याने किनवट पोलीस स्टेशनच्या वतीने गंभीर दखल घेण्यात आली आहे. अनेक शाळा व कोचिंग क्लासेसमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक आपल्या मुलांना १८ वर्षे पूर्ण झालेली नसतानाही व वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही दुचाकी व अन्य वाहने देत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब पूर्णपणे बेकायदेशीर व बेजबाबदारपणाची असून, यापुढे अशा प्रकारांना मुळीच खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा किनवट पोलीस प्रशासनाने एका पत्रका द्वारे दिला आहे. अल्पवयीन मुलांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास केवळ मुलांवरच नव्हे तर संबंधित पालकांनाही दोषी धरले जाणार असून, त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, मोटार वाहन कायद्यातील कलम ३, ४, ५, १८०, १८१ तसेच जुवेनाईल जस्टीस (JJ Act) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# गरुडेश्वरच्या विद्यार्थिनींचा कलाविष्कार

**नाशिक कळवण : (समर्थ गांवकरी)**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त (दि.३) जानेवारी रोजी देशभरातून, विशेषतः शिक्षण क्षेत्रातून मुलींकडून त्यांना विनम्र अभिवादन केले जात आहे. शिक्षण, स्त्री - सक्षमीकरण आणि सामाजिक न्यायासाठी केलेल्या त्यांच्या अमूल्य कार्याची आठवण करून दिली जात आहे. मुलींसाठी पहिली शाळा उघडून शिक्षणाची कवाडं खुली करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. सावित्रीबाईंच्या जन्मदिनाला बालिका दिन तसेच महिलामुक्ती दिन म्हणून देखील साजरा करण्यात येतो.



क्रांतीज्योतीच्या जयंतीनिमित्त वेगवेगळ्या माध्यमातून त्यांना अभिवादन केले जात आहे. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या शासकीय माध्यमिक आश्रमशाळा पिंपळगाव गरुडेश्वर येथील विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ह्यांना त्यांच्या जयंतीनिमित्त स्वतःच्या वेगवेगळ्या कलेच्या माध्यमातून अभिवादन केले. सावित्रीबाई ज्योतिबा फुले स्मारक, मुंबई नाका येथे आश्रमशाळा पिंपळगावच्या विद्यार्थिनींनी आदिवासी तारपा संगीतावर पिरॅमिड नृत्य सादरीकरण केले तसेच मी सावित्रीबाई फुले बोलतेय हे एकपात्री नाटक, साऊ पेटती मशाल ह्या गाण्यावर सामूहिक नृत्य, सावित्रीबाईंचे महिला विकासाचे कार्य हे पथनाट्य आदी कलेच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी सर्व विद्यार्थिनींनी आपल्या कलेच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मने जिंकून घेतली. याप्रसंगी, विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता कुलथे, अधीक्षिका कोमल रामटेके, प्राथमिक शिक्षक आनंद पाटील, आरोग्य परिचारिका सारिका कचरे आणि सहभागी विद्यार्थिनी आदी उपस्थित होते. विद्यार्थिनींनी साजरा केलेल्या या अनोख्या जयंती निमित्त त्यांचे सर्वांकडून कौतुक करण्यात आले.



ठाणे : दिव्यात बी आर नगर जवळील सिद्धार्थ बुद्ध विहार येथे ख्यातनाम लोककवी दीनानाथ कांबळे यांच्या पत्नी ललिता कांबळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गित गायनाचा कार्यक्रम पार पडला. प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विकास इंगळे, डॉ.गाथा इंगळे, डॉ.देवेद्र कांबळे, रुपेश कांबळे यांनी उपस्थित राहून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहून समस्त कांबळे कुटुंबाचे सात्वन केले.

(फोटो - संतोष पडवळ)

# शालेय वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**(समर्थ गांवकरी)**

दि. 5 जानेवारी २०२६ रोजी एस एन इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय मेघाताई नितीन राक्षे तर प्रमुख पाहुणे म्हणून माननीय दिलीपराव मोहिते पाटील यांची उपस्थिती लाभली. तसेच माजी नगराध्यक्ष बापू थिगळे, मच्छिंद्र राक्षे, सतीश राक्षे, अमोल काका सांडभोर, बापू सांडभोर, विकास चव्हाण, धर्मराज पवळे सर ,गोरक्ष राक्षे या सर्वांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली.

# सारडा महाविद्यालयात रांगोळी स्पर्धेतून मतदार जागृतीचा दिला संदेश

## रांगोळी स्पर्धेत विद्यार्थीनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

अहिल्यानगर येथे होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृती या विषयावर सुंदर रांगोळीचे रेखाटन केले होते.आपले मत आपला अधिकार,प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा.हा संदेश रांगोळी स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी दिला.या रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मतदार जनजागृतीची शपथ देण्यात आली. याप्रसंगी सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित,प्रबंधक अशोक अशेरी, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य गिरीश पाखरे, स्नेहसंमेलनाचे कार्याध्यक्षा अपर्णा शेपाळ, आदी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीचा संदेश दिला आहे. हे कौतुकास्पद बाब आहे. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा.मतदान हा प्रत्येकाचा अधिकार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना महाविद्यालयाने पारितोषिक दिले आहेच.तरी देखील महानगरपालिकेच्या वतीने या विद्यार्थांना पारीतोषिक देऊन गौरविण्यात येईल.



प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाले, स्नेहसंमेलनानिमित्त सात दिवस वेगवेगळे डेज व विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.रांगोळी स्पर्धेत सहभागी होत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला आहे.

यावेळी सुत्रसंचलन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले.आभार अपर्णा शेपाळ यांनी मानले.

रांगोळी स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे अक्षरा जाधव-प्रथम,मुक्ता खुपसे- द्वितीय,मयुरी वाघमारे - तृतीय, तेजस्वी विधाते-उत्तेजनार्थ प्रथम, अंकिता भुक्कन /लवीना lund-उत्तेजनार्थ द्वितीय विभागुन,शुभ्रा बाले/नम्रा राठोड- उत्तेजनार्थ तृतीय विभागुन पारीतोषिके देण्यात आली.

# 'शेवटी सज्जन माणसेच जिंकतात'




## संपादकीय

सज्जन आणि शक्ती हे दोन शब्द एकत्र करून निर्माण होणारा एक साधा सोपा शब्द 'सज्जनशक्ती'! डॉ. नरेंद्र दाभोलकर त्यांच्या विवेकवादाच्या मांडणीमध्ये कायम हा शब्द वापरायचे. आपण कोणतीही विचारधारा मानत असू किंवा कोणतीच विचारधारा मानत नसू. वेगवेगळे देव आणि धर्म मानत असू किंवा अजिबात मानत नसू, आपण जगातील कोणत्याही कोपऱ्यात राहत असू तरी सज्जनशक्ती म्हटले की, त्याचा अर्थ कोणत्याही माणसाला सहज उलगडेल. प्रत्यक्षात सज्जनशक्तीविषयी आजूबाजूची परिस्थिती तपासून बघायची ठरली तर काय चित्र दिसते?

गल्लीपासून केवळ दिल्लीपर्यंतच नाही तर अगदी अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनपर्यंत सांप्रतकाळी सगळ्यात अडचणीत असलेली गोष्ट कोणती?- असा अभ्यास करायचा ठरला तर त्यामध्ये सज्जनशक्तीचा अगदी वरती नंबर लागेल! काही ताजी उदाहरणे.. गल्लीपासून सुरुवात करू. महाराष्ट्रातील बहुतांश भागांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. त्यात सज्जनशक्ती तर खूप दूरची गोष्ट; सज्जन व्यक्ती आणि सज्जनपणा यांचादेखील दुरान्वये संबंध राहिलेला नाही! पैशाचा पाण्यासारखा वापर, जातधर्माची टोकदार गणिते, बिनविरोध निवडणुका, संपूर्ण विधिशून्य युत्या आणि आघाड्या याला उधाण आल्याचे चित्र आहे.

आता दिल्लीमधील उदाहरण पाहूया. आपल्या देशाच्या राजधानीमध्ये गेल्या दहा-बारा वर्षांत हवा इतकी खराब झाली आहे की, ज्याचे नाव ते! या दिल्ली शहरात आपल्या देशाचे पंतप्रधान आणि सर्व मंत्रिमंडळ राहते, देशाचे राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधीश, सर्व प्रमुख माध्यमकर्मी राहतात. ते सगळे हीच हवा रोज फुफ्फुसात घेतात; पण परिस्थितीमध्ये काहीही फरक नाही! उलट ती दिवसेंदिवस खराबच होत चालली आहे. इतकेच नाही, तर दिल्लीमधील हवेच्या प्रदूषणाविषयी शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्या सज्जनांना दिल्ली पोलिसांनी अटक केल्याची बातमी नुकतीच येऊन गेली! देशाच्या बाहेर जगाचे सत्ताकेंद्र म्हणून



अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टनचे उदाहरण बघूया. तिथल्या राष्ट्राध्यक्ष महोदयांनी तर कहरच केला आहे. मनात आले की, एका देशावर हल्ला कर, कुठल्या देशाच्या राष्ट्राध्यक्षाला उचलून आण, असे सर्व चालले आहे. सकृतदर्शनी सज्जन असणे ही प्रभावहीन गोष्ट झाली की काय, अशी शंका मनात येण्याच्या कालखंडात त्याच सज्जनपणा आणि सज्जनशक्ती याविषयी आपण या सदरात बोलणार आहे. सज्जनपणा म्हणजे नक्की काय? तो माणसांच्या मध्ये कुठून आला? तो खरंच वाढवता येतो का? याविषयी आपण बोलणार आहे. जेव्हा आजूबाजूची परिस्थिती विपरीत असते तेव्हा सज्जनपणाने वागावे? की जे चालू आहे त्याच्याचमध्ये आपलाही सूर मिसळून द्यावा, अशा गोष्टींच्या विषयीदेखील आपण बोलूया.

अत्यंत विपरीत परिस्थितीमध्ये देखील आपला सज्जनपणा न सोडण्याचे सामर्थ्य माणसामध्ये कुठून येते, याचापण आपण शोध घेऊ. आपल्या आजूबाजूला अशा विपरीत परिस्थितीत सज्जनपणा टिकवून लढणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती आणि घटनांना भेटूया.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ६८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | 1 | 3 | | | 8 | 4 | 6 |
| | 3 | 4 | | 6 | | | 1 | |
| | | | | | | 9 | | |
| 1 | | | 5 | 8 | 6 | | | |
| | | 8 | | 7 | | 4 | | |
| | | | 2 | 1 | 4 | | | 5 |
| | | 9 | | | | | | |
| | 8 | | | 9 | | 1 | 7 | |
| 4 | 7 | 5 | | | 1 | 2 | | 9 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ६७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 2 | 8 | 7 | 4 | 1 | 6 | 5 | 9 |
| 9 | 4 | 7 | 5 | 3 | 6 | 2 | 1 | 8 |
| 6 | 5 | 1 | 9 | 2 | 8 | 7 | 4 | 3 |
| 2 | 8 | 4 | 6 | 7 | 9 | 1 | 3 | 5 |
| 1 | 3 | 6 | 2 | 8 | 5 | 4 | 9 | 7 |
| 7 | 9 | 5 | 3 | 1 | 4 | 8 | 2 | 6 |
| 4 | 6 | 3 | 8 | 9 | 2 | 5 | 7 | 1 |
| 5 | 1 | 9 | 4 | 6 | 7 | 3 | 8 | 2 |
| 8 | 7 | 2 | 1 | 5 | 3 | 9 | 6 | 4 |

**पंचांग**
७ जानेवारी २०२५
बुधवार
विक्रम संवत्- २०८२
पौष शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- पौष
ऋतु- सौर शिशिर
कृष्ण पक्ष
तिथि:पंचमी ३०:३३:५४+
नक्षत्र:मघा ११:५६:१३

योग:आयुष्मान
१८:३३:१६
करण:कौलव १८:३६:५७
करण:तैतिल
३०:३३:५४+
सूर्य:धनु

## उपदेशाचे डोस

### यशाला 'शॉर्टकट' नाही

आयुष्यात आपल्याला पुढे जायचे असेल, यशस्वी व्हावयाचे असेल तर भरपूर काबाडकष्ट, परिश्रम करण्याची तयारी हवी. यश तसे मिळत नाही. प्रतिभा म्हणजे दुसरं काही नाही. 'नव्याण्णव टक्के घाम नि एक टक्का राम ।' असे म्हणतात. (जिनीयस इज नाइन्टीनाइन परसेंट... पार्स्पिरेशन अॅन्ड वन परसेंट इन्स्पिरेशन) लेखनाची ढोरमेहनत, काबाडकष्ट यांना सीमा नसते. टॉलस्टॉयने

'वॉर अॅन्ड पीस'सारखी जंगी कादंबरी सात वेळा नव्याने लिहिली आणि त्याच्या पत्नीने न कंटाळता सात वेळा तिची 'फेअर कॉपी' केली! रचना लिहून पुरी झाली की, लेखकाला उमजते - हे असे नाही, असे लिहिले जायला हवे होते. 'रन्वाँ' या प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शकाने म्हटले होते, 'एखादी फिल्म मी पुरी करतो तेव्हा मला कळते ती कशी करायला हवी होती. (व्हेन यू फिनिश मेकिंग ए फिल्म, यू नो देन हाऊ यू शूड हॅव मेड इट)

कथा उपदेश : परिश्रमाला पर्याय नाही.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५५८- फ्रेंचांनी इंग्लडकडून कॅले हे बंदर जिंकून परत घेतले.
- १६१०- गॅलिलियोने दूरदर्शीच्या साहाय्याने आयो, युरोपा, गॅनिमिडी आणि कॅलिस्टो या गुरूच्या चार उपग्रहानचा शोध लावला.
- १७८१- जॉर्ज वॉशिंग्टन अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले.
- १९६८- अमेरिकेचे स्वर्हेयर हे यान चंद्राच्या 'टायको' या विवराच्या काठी उतरले.
- २००७- अल सालवाडोरच्या तुरुंगात झालेल्या संघर्षात १७ जण ठार.

### राष्ट्रीय

- १९९२- विश्वनाथ आनंद ग्रँडमास्टर बनला.
- २००८ - प्रसिद्ध ब्यूटीशियन शहनाज हुसेन यांच्या मुलगा समीरचा पाटण्यात संशयास्पद मृत्यू झाला.


### जन्म

- १९२२- लोकसाहित्याच्या अभ्यासक सरोजिनी बाबार यांचा जन्म.
- १९२५- जर्सी झूलॉजिकल पार्कचे संचालक आणि प्राणी व निसर्गविषयक लेखक जोराल्ड डरेल यांचा जन्म.
- १९९२- न्यूयॉर्कचा व्यंगचित्रकार आणि 'अॅडाम्स फॅमिली ऑफ घाऊल्स' चा लेखक चार्ल्स अॅडाम्सचा जन्म.

### निधन

- १५३६- आठव्या हेन्रीची पहिली पत्नी अरगॉनची कॅथेरीन हिचा मृत्यू.
- १९८१- दुसऱ्या महायुद्धाच्या काळात त्या आधी व नंतर जापानचे सम्राटपद भूषविणाऱ्या मिचिनोमिया हिरोहितोचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ६८



### आडवे शब्द

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '--- --- ज्योती'
६. निर्णय
९. समुद्रकिनारा
१२. हिंदीत पशू
१४. डुक्कर
१५. गायीचे पिल्लू
१६. मुरुमाची जमीन
१८. रमापती
२०. खराब झालेला आंबा
२१. व्यक्ती, मनुष्य
२३. अनुयायी, पायदळातील शिपाई
२५. स्वामी
२६. समुद्र
२७. जास्तीत जास्त व कमीत कमी
२९. चालविणारा अवयव
३०. दारूचा एक प्रकार
३२. मलई
३३. दिवस
३४. मध
३६. सर्वस्व
३७. गाय
३८. खाली मान घातलेला
४०. रत्न
४२. श्रीविष्णुचे बटुरूप
४६. होडी
४७. आई
४८. वरपांगी, दिखाऊ
४९. मीठाची चव
५०. तीव्र ऊन
५२. भूतकाळ
५४. वाळवंट
५५. लक्ष्मीचे एक नाव
५७. नूतन
६०. षष्ठीची देवता
६२. वृक्ष
६३. वर्ष, साल
६५. अखेर
६७. उद्यानंतरचा दिवस
६९. वचक
७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका
७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन
७४. वाईट, नासके
७६. मकर
७७. नवा जोम, चपळता
८०. हात
८१. माळेत हे ओवतात
८२. माती नसलेली जमीन

### उभे शब्द

१. अव्यस्थित राहणारा
२. अंत:करण
३. गोव्यातील शिवशंभो
४. सोन्याचा वस्त्रातील धागा
५. शहर
६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
७. तुरूंग
८. लाट, हुक्की
१०. एक शेंगभाजी
११. आवड, रूची
१२. तारूण्य
१६. ठेकेदार
१७. आईचा भाऊ
१९. नवरदेवाची आई
२२. संतोष, आनंद
२४. गुणज्ञ
२५. चित्रपटाचा हिरो
२८. शेतकरी
२९. गरीब, क्षुल्लक
३०. दात
३१. जन्म-मृत्यू
३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३५. रंगवलेले
३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय
४०. प्रजा
४१. खास, विशेष हकीगत
४२. शेतजमीन
४३. गोदाम
४४. पदार्थ शिजतानाचा आवाज
४७. पत्ता
५१. रड्या माणूस
५३. कर्ण
५६. खवा
५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप
५९. गाडीचे छत
६०. प्रश्न
६१. मुस्लिमांचा एक सण
६४. नट्टापट्टा
६६. बंगाली रुपया
६८. शुष्कता
७१. सुंदर तरुणी
७३. फणसाचा एक प्रकार
७४. गाढव
७५. बगळा
७८. रमणीय, मनोहारी
७९. पद्धत

उत्तर उद्याच्या अंकात

### शब्दकोडे क्र. ६७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.शिमगा ४.अजगर ७.अगरबत्ती ११.कासव १२.जमाव १३.उमा १४.रातसार १६.गडकरी १८.पर १९.धन २०.नवनीत २२.अज २३.सोम २४.मघा २५.कानशील २६.तोतरा २८.मकर ३०.तरस ३२.जन ३३.मन ३५.दळ ३६.विमानतळ ३८.रडतखडत ४१.वानर ४३.रग ४४.ददात ४६.संतापणे ४८.मजलदरमजल ५२.प्रहार ५३.अवांतर ५४.मावा ५५.वसा ५७.रकाना ५९.तप ६०.जारणमारण ६२.नाराज ६४.कारभार ६८.साथ ६९.तडक ७०.पारावार ७२.नयन ७३.रवि ७४.डहाळी ७६.पारवा ७७.समज ७८.कारा ७९.लवकर ८०.रत्नाकर

उभे उत्तर : १.शिकार २.मस ३.गावरान ४.अवसानघात ५.गज ६.रमाकांत ८.गरुड ९.बकरी १०.कुमार १३.उपजत १५.रव १६.गजानन १७.कमालकिमान १९.धमक २१.नीरस २२.आतोनात २३.सोमवार २५.काजळ २७.राणी २९.रमतगमत ३१.रजत ३४.नख ३५.दरदाम ३६.विवाह ३७.नरसंहार ३९.डर ४०.डबल ४२.मणेर ४४.दरवाजा ४५.तज ४७.तारकानाथ ४९.जरतर ५०.दमा ५१.लवमात्र ५३.अमकातमका ५६.सार ५८.नारा ६१.रबर ६३.जयविजय ६५.रड ६६.भाकड ६७.पारा ६८.सान ७०.पाळीव ७१.वासर ७२.नवार ७३.रम ७५.हाल ७६.पागा ७७.सर

# फनी गेम्सच्या स्पर्धा उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी फनीगेम्स विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आले.

सारडा महाविद्यालयाच्या क्रीडा मैदानात उत्साहपूर्ण वातावरणात रस्सी खेच स्पर्धा, डोज बॉल, टेनीस बॉल क्रिकेट, बास्केटबॉल, पिठातला पैसा शोधने या स्पर्धा संपन्न झाले. या सर्व क्रीडा प्रकारात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विजेता स्पर्धकांना सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देण्यात आले. याप्रसंगी प्रबंधक अशोक अशेरी, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मिलिंद देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य गिरीश पाखरे, स्नेहसंमेलनाच्या कार्याध्यक्ष



अपर्णा शेवाळ,क्रीडा संचालक प्रा. संजय धोपावकर, प्रा.संजय साठे,प्रा. गावडे मॅडम आदी उपस्थित होते. रस्सी खेच स्पर्धा मुली-प्रथम क्रमांक -जुनिअर मुली (12वी कॉमर्स), द्वितीय क्रमांक - सिनीअर मूली ( एफ.वाय.बीए, बीकॉम),तृतीय क्रंमाक -जुनीअर मूली(11वी कॉमर्स),रस्सी खेच स्पर्धा मुले- ,प्रथम क्रमांक- जुनीअर मुले(११वी) व्दितीय क्रमांक :- जुनीअर मुले (१२वी) डोज बोल- प्रथम क्रमांक- जूनीअर मुली,(११वी),द्वितीय क्रमांक -सिनीअर मुली (एफ.वाय.बीए, बीकॉम), बास्केटबॉल :-प्रथम क्रमांक जुनीअर मुली (११ वी, १२ वी) व्दितीय क्रमांक- सिनीअर मुली(एफ वाय एस वाय),टेनीस बॉल क्रिकेट मुली-, प्रथम क्रमांक: मुली (११वी), व्दितीय क्रमांक :- मुली (१२वी),टेनीस बॉल क्रिकेट मुले -प्रथम क्रमाक -(टी वाय बी सी एस),व्दितीय क्रमांक :-(एस वाय बीबीए सीए), पिठातला पैसा शोधने-प्रथम क्रमांक -अनुष्का भरणे, व्दितीय क्रमांक- किर्ती चक्रवती,तृतीय क्रमांक- श्रेया त्रिपाद ११वी,चेस स्पर्धा -प्रथम क्रमांक - अर्थव महाजन,दितीय क्रमांक- अनिकेत भांगे,तृतीय क्रमांक-चिन्नमय दसरे (एम कॉम फर्स्ट इयर)संगित खुर्ची महिला- प्रथम क्रमांक :-प्रा. मानीक रासने,दितीय क्रमांक: प्रा. रेणूका कुलकर्णी,तृतीय क्रमांक :- प्रा.अमिता भालेराव आदींनी स्पर्धेत यश संपादन केले.

*सालाबादप्रमाणे यंदाही श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट या विश्वस्त संस्थेच्यावतीने*

# २०२६ वर्षाची अधिकृत दिनदर्शिका तयार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**




नाशिक येथील जिल्हा न्यायालयात प्रधान व जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. सप्तशृंगगडाचे धार्मिक महत्त्व आणि भाविकांना मिळणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ही दिनदर्शिका दरवर्षी प्रकाशित केली जाते. या दिनदर्शिकेमध्ये वर्षभरातील विविध पूजाविधींचे वेळापत्रक, विश्वस्त संस्थेच्या माध्यमातून भाविकांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवा-सुविधा, सप्तशृंगगडाचे ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व तसेच आजूबाजूच्या परिसरातील तीर्थक्षेत्रांचे स्थान माहात्म्य यावर सविस्तर प्रकाश टाकण्यात आला आहे. याशिवाय, ट्रस्टच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांसाठी देणगी देण्यासंदर्भातील माहितीही यात विशद करण्यात आली आहे.

या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश अभय लाहोटी, सह धर्मादाय आयुक्त विवेक सोनुने, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) पी के देशपांडे, मुख्य न्यायदंडाधिकारी बी एम इचपुराणी, ट्रस्टचे विश्वस्त अॅड. ललित निकम, अॅड. दिपक पाटोदकर, तहसीलदार रोहिदास वारुळे, मनज्योत पाटील, डॉ. प्रशांत देवरे आणि भूषणराज तळेकर , कोर्ट व्यवस्थापक अशोक दा र के,यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ट्रस्टचे व्यवस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन दहातोंडे, सहाय्यक व्यवस्थापक तथा कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, जनसंपर्क अधिकारी भिकन वाबळे , संतोष चव्हाण ,यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते. ही दिनदर्शिका गडावर येणाऱ्या हजारो भाविकांसाठी माहितीचा एक महत्त्वपूर्ण स्रोत ठरणार आहे असा आशावाद प्रधान व जिल्हा सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी यांनी प्रकाशन सोहळ्या दरम्यान व्यक्त केला.

# वसंतराव नाईक पतसंस्था उत्कृष्टता आणि गुणवत्ता पुरस्कार २०२५ ने सन्मानित



**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या अतिरिक्त आयुक्त आणि विशेष निबंधक सहकारी संस्था यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय निवड समितीने वसंतराव नाईक नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे यांची "पत" क्षेत्र श्रेणीतील द्वितीय क्रमांकाच्या सहकारी उत्कृष्टता व गुणवत्ता पुरस्कारासाठी निवड केली होती. राष्ट्रीय सहकारी विकास निगम (सहकार मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली) प्रादेशिक संचालक श्री.गिर्राज अग्निहोत्री यांच्या शुभहस्ते व पीडिसीसी बँकेचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान संचालक श्री.संजयशेठ काळे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थित संस्थेचे चेअरमन श्री. नेताजीदादा डोके, व्हा. चेअरमन श्री. राजूशेठ चौगुले, सेक्रेटरी श्री. विठ्ठलशेठ वायकर , संचालक श्री. निवृत्तीशेठ भोसले, श्री. टी आर वामन साहेब, श्री. राजेंद्र पायमोडे, श्री. बी एम शिंदे सर, श्री. किशोरशेठ होनराव, श्री. नितीनशेठ वाळूंज, श्री. दिनकरशेठ राहींज, श्री. महेंद्र लाड, श्री. सोमनाथशेठ गडगे, मुख्य व्यवस्थापक श्री. दिनकर देवकर, अधिकारी श्री संतोष शिंदे व श्री किशोर वाळूंज यांनी स्वीकारला.

संस्थेचे महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असून संस्थेच्या मुख्य कार्यालयासह १० शाखा कार्यरत आहे. संस्थेकडे ३४८ कोटी ०२ लाखाच्या ठेवी असून २७७ कोटी ९६ लाखांचे कर्ज वाटप केलेले आहे. संस्थेचा निधी २३ कोटी ८१ लाख असून १०४ कोटी ३७ लाखांची गुंतवणूक केलेली आहे.



# नितीन ससाने यांना मातृशोक

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर येथील ज्येष्ठ वारकरी ह भ प हिरा रामदास ससाणे वय ७४ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. यांच्या पाठीमागे तिन मुल , सुना,नातवंडे असा परिवार आहे . जुन्नर शहर व परिसरात सांप्रदायिक वारसा सातत्याने ह भ प ससाणे यांनी शेवटपर्यंत सुरू ठेवला . यांचा मुलगा पत्रकार नितीन ससाने जुन्नर शहर प्रेस क्लब खजिनादार असुन दैनिक लोकमत वर्तमानपत्राचे वार्तांकन करीत आहे.

# लेंडी बागेत ५० रातराणीची लागवड

- ग्रीन अँड क्लीन शिर्डीचा सुगंधी उपक्रम
- शिर्डी परिक्रमेची अधिकृत घोषणा

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

सर्वधर्म समभावाचा संदेश देणाऱ्या श्री साईबाबांच्या शिर्डी नगरीत साई मंदिर परिसरातील लेंडी बागेत आज ग्रीन अँड क्लीन शिर्डी फाउंडेशन यांच्या संकल्पनेतून लावण्यात आलेल्या सुहासिक अशा रातराणी फुल झाडांचा सुवास आता संपूर्ण साई मंदिर परिसरात दरवळणार आहे.

दरम्यान दि.13 फेब्रुवारी 2026 रोजी होऊ घातलेल्या ऐतिहासिक शिर्डी परिक्रमेची घोषणा आज या निमित्ताने करण्यात आली. या कार्यक्रमास साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, शिर्डी नगर परिषदेचे जेष्ठ नगरसेवक अभय राजे शेळके, साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार, नवनिर्वाचित नगरसेवक मंगेश त्रिभुवन, नगरसेवक अमित शेळके, नगरसेवक नंदू गोंदकर, नगरसेवक दीपक गोंदकर,




नगरसेवक बापू ठाकरे, ग्रीन अँड क्लीन शिर्डीचे अध्यक्ष अजित पारख, अॅड अनिल शेजवळ, मनीलाल पटेल, सोसायटीचे संचालक रामभाऊ गागरे, संजय शिरडीकर, मयूर चोळके, ऋषी माळी, मनोज वाघ, माऊली जवक, नारायण दराडे, विश्वनाथ गायकवाड, श्री गवारे, रोहित गुंजाळ, प्रज्वल त्रिभुवन आधी सह साई संस्थान बगीचा विभागाचे भणगे उपस्थित होते. यावेळी प्रधान लेंडी बागेत 50 रातराणीची झाडे मान्यवरांच्या उपस्थितीत लावण्यात आली.

यावेळी बोलताना मनीलाल पटेल म्हणाले, 13 फेब्रुवारी 2026 रोजी शिर्डी परिक्रमा महोत्सव असल्याने दरवर्षी नवीन विचार संकल्प समोर येतो आणि पवित्र लेंडी बागेत आज 50 झाडे लावण्यात आली. ज्या दिवशी या फुलांचा सुगंध चावडी द्वारकामाईपर्यंत पोहोचेल तेव्हाच खऱ्या अर्थाने शिर्डी परिक्रमा आणि ग्रीन अँड क्लीन शिर्डी तसेच शिर्डी ग्रामस्थांचे उद्दिष्ट साध्य होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ज्येष्ठ नगरसेवक अभय शेळके म्हणाले 13 फेब्रुवारी साई भक्तांच्या स्वागतासाठी शिर्डी ग्रामस्थ सज्ज झाले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून या बाबांच्या पवित्र लेंडी बागेत रातराणीची झाडे लावली असून त्याचा सुगंध शिर्डी सह परिसरात दरवळणार आहे. आम्ही सर्व नगरसेवक यासाठी पाऊल उचलले असून आपण देखील या परिक्रमेसाठी पाऊल उचलावे असे आव्हान त्यांनी केले. नगरसेवक दीपक गोंदकर म्हणाले,13 फेब्रुवारी रोजी शिर्डी परिक्रमेत जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे, लेंडी बागेतील या रातराणी फुलांचा सुगंध मंदिर तसेच संपूर्ण परिसरात दरवळेल.

# मानाच्या काठ्यांच्या मिरवणुकीने यात्रेची सांगता

- कोरठण गडावर भक्तांचा जनसागर
- तीन दिवसांचा भक्तीमहोत्सव परंपरेच्या साक्षीने संपन्न
- 'जय मल्हार'च्या गजरात कोरठण गड न्हाऊन निघाला

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पिंपळगाव रोठा (ता. पारनेर,) येथील राज्यस्तरीय 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र असलेल्या श्री कोरठण खंडोबा देवस्थानच्या तीन दिवसांच्या वार्षिक यात्रोत्सवाची मानाच्या काठ्यांच्या भव्य मिरवणुकीने भावपूर्ण सांगता झाली. 'जय मल्हार'च्या गजरात संपूर्ण गड भक्तिरसात न्हाऊन निघाला.

यात्रेच्या शेवटच्या दिवशी पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी प्रचंड गर्दी केली.



थंडगार वाऱ्यातही डोळ्यात भक्ती आणि मनात मल्हारीची आस घेऊन हजारो भाविक गडावर लोटले. सकाळी अकरानंतर जनसागर उसळला, परिसरात पाय ठेवायला जागा उरली नाही, तरी चेहऱ्यावर फक्त श्रद्धा आणि समाधान दिसले.

शासकीय महापूजेने यात्रेचा समारोप झाला. पोलीस उपअधीक्षक शिरीष ओमणे, तहसीलदार गायत्री सौंदाणे, पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या हस्ते मानाच्या काठ्यांची महापूजा व महाआरती पार पडली. पुणे जिल्ह्यातील बेल्हे येथील मानाच्या काठीने कळस घेतला, तर ब्राह्मणवाडा येथील काठीने देवदर्शन घेतले. त्यानंतर अळकुटी, साकुरी, वडगाव तांदळी, राजापूर, माळवाडी, कासारे आदी गावांच्या काठ्यांच्या मिरवणुका झाल्या.

दुपारी खंडोबाची चांदीची पालखी मानाच्या काठ्यांसह मिरवणुकीत निघाली. ढोल-ताशांचा गजर, लेझीमचे ठेके, फुलांची उधळण आणि अखंड 'जय मल्हार'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला. पिढ्यान्पिढ्या जपली जाणारी ही परंपरा पाहून अनेक भाविक भावविवश झाले. देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी व सेवेकरी उपस्थित होते.

हा यात्रोत्सव श्रद्धा, परंपरा, लोकसंस्कृती आणि गावोगावी एकतेचा जागर ठरला. 'पुन्हा भेटू मल्हारा'च्या भावनेने भाविक जड अंतःकरणाने परतले.

बेल्हे व ब्राह्मणवाडाच्या मानाच्या काठ्यांनी कोरठण गडावर भक्तीचा कळस गाठला. तीन दिवसांच्या यात्रोत्सवात 'जय मल्हार'च्या गजरात जनसागर लोटला. शासकीय महापूजेने परंपरेचा सन्मान करीत यात्रेची भावस्पर्शी सांगता झाली, श्रद्धा व एकतेचे बंध अधिक दृढ झाले.

# महिलेला चाकूने हल्ला करून ठार

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यात घर व जमिनीच्या वादावरून भांडण व मारामारी झालेली जुन्नर पोलीस स्टेशन व न्यायालयामध्ये समजते , पण निमगिरीआदिवासी दुर्गम भागात महिलेला चाकूने ठार केलेली घटनेमुळे तालुक्यामध्ये चिंतेचे वातावरण झालेले दिसते . जुन्नर पोलीस स्टेशन येथे शरद निंबा साबळे यांनी फिर्याद दिली की, दि. ५ जानेवारी सायं. ५ : ४५ वा मौजे निमगिरी येथे राहत्या घरासमोरील अंगणात फिर्यादी यांचा भाऊ आरोपी तुषार निंबा साबळे याने माझी पत्नी अरुणा शरद साबळे वय ३८ वर्ष हिच्या घराच्या व जमिनीच्या वादाच्या कारणावरून चाकूने छातीवर, हातावर भोसकून जीवे ठार मारले आहे . याबाबत जुन्नर पोलीस स्टेशन येथे आरोपी तुषार निंबा साबळे अटक नाही .

# जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचा धुरळा उडणार

## ७ फेब्रुवारी तारखेस होणार मतदान

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यामध्ये सध्या २९ महानगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. येत्या १५ जानेवारीला महापालिका निवडणुकीसाठी मतदान होणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ जानेवारीला निकाल लागणार आहे. ही निवडणूक पार पडताच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचा धुरळा उडणार आहे.

याच आठवड्यामध्ये दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या निवडणुकांसाठी पुढच्या महिन्यात ७ फेब्रुवारी रोजी मतदान होण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाकडून ७ जानेवारी रोजी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. राज्यामधील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांसाठी निवडणूक होणार आहे. यामधील १७ जिल्हा परिषद आणि ८८ पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. त्यामुळे आरक्षणाच्या मर्यादेमध्ये असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. याची तयारी राज्य निवडणूक आयोगाकाकडून केली जात आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक महापालिका निवडणुका पार पडल्यानंतरच होणार आहे. सध्या २९ महानगर पालिकांच्या निवडणुका सुरू आहेत. या निवडणुकीमध्ये २९ जिल्हातील संपूर्ण यंत्रणा व्यस्त आहे. काही महापालिकांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी पोलिस अधिकारी आणि अतिरिक्त अधिकारी या कामामध्ये व्यस्त आहेत.

सुप्रीम कोर्टाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यात याव्यात असे आदेश दिले होते. पण आरक्षणाच्या पेचामुळे जिल्हा परिषद निवडणुकीवर परिणाम झाला आहे.

या आरक्षणामुळेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करण्यास उशिर होत आहे. पण आता या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची लवकरच घोषणा होण्याची शक्यता आहे. ७ फेब्रुवारी रोजी यासाठी मतदान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पारनेर तहसीलदारांना निलंबित करा : सुजित झावरे पाटील यांचा संतप्त इशारा

- सुजित झावरे पाटील यांची तहसीलदारांवर आगपाखड
- पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातून वाळूचा खडा उचलू देणार नाही
- वाळूचे डंपर भर रस्त्यात पेटवून देऊ
- आता कायदा हातात घेतल्याशिवाय शांत राहणार नाही

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील मांडओहळ परिसरातून सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीमुळे पुन्हा एकदा निष्पाप तरुणाचा जीव गेला आहे. रविवारी (४ जानेवारी २०२६) सकाळी सुमारे ७ वाजता मांडओहळ नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या भरधाव डंपरने बोकनकवाडी ते वासुंदे रोडवर दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात संतोष नऱ्हे (वय ३२, रा. बोकनकवाडी, ता. पारनेर) यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की, दुचाकीचा पूर्णपणे चक्काचूर झाला आणि परिसरात हळहळ व्यक्त झाली.

या घटनेने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी, युवकांनी आणि कार्यकर्त्यांनी तात्काळ प्रतिक्रिया देत मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून टाकळी ढोकेश्वर येथील वासुंदे चौकात मुख्य रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन छेडले. शिवसेना नेते तथा जिल्हापरिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील



यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. आंदोलन नगर कल्याण महामार्गावर सलग तीन तास सुरू होते. आंदोलकांनी थेट पारनेर तहसीलदारांच्या निलंबनाची मागणी करत प्रशासनाच्या हलगर्जीपणावर जोरदार टीका केली.

मांडओहळ परिसरात गेल्या काही वर्षांपासून अवैध वाळू उत्खनन आणि भरधाव डंपरांची बेधडक वाहतूक सुरू आहे. यामुळे वारंवार अपघात घडत असूनही महसूल आणि पोलीस प्रशासनाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या अवैध धंद्यात वाळू माफियांचा समावेश असून त्यांना प्रशासकीय पाठबळ मिळत असल्याची भावना परिसरात आहे. संतोष नऱ्हे यांचा मृत्यू हा अपघात नसून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे घडलेला खून असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

आंदोलनादरम्यान आंदोलकांनी अनेक मागण्या जोरदारपणे मांडल्या. मांडओहळ परिसरातील अवैध वाळू उत्खनन तात्काळ बंद करावे, वाळू माफियांवर कठोर गुन्हे दाखल करावेत, अपघातातील डंपर चालक आणि मालकावर हत्येचा गुन्हा दाखल करावा, तसेच महसूल आणि पोलीस विभागाने समन्वय साधून दोषींना कठोर शिक्षा करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. याशिवाय पारनेर तहसीलदारांच्या कार्यपद्धतीवरही आंदोलकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांनी तहसील कार्यालयात जाताना होणाऱ्या अपमानास्पद वागणुकीबाबत आणि अरेरावी भाषेच्या वापराबाबत तक्रारी मांडल्या. तहसीलदार जनतेवर माज दाखवत असल्याचा आरोप करत त्यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे, अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली.

रस्ता रोको आंदोलनामुळे नगर कल्याण महामार्ग व पारनेर ते साकुर मुख्य रस्त्यावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली. अनेक वाहने रांगेत उभी राहिली. मात्र आंदोलकांनी शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन केले. त्यांनी प्रशासनाला निवेदन सादर करत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मागण्या पाठवण्याची विनंती केली. पोलीस आणि महसूल अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी चर्चा करून वरिष्ठांकडे मागण्या पाठवण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

आंदोलकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला की, अवैध वाळू वाहतुकीमुळे आणखी दुर्दैवी घटना घडल्यास संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील आणि यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल. परिसरातील नागरिकांनी एकजूट दाखवत अवैध वाळू धंद्याला आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

यावेळी सुजित झावरे पाटील यांच्यासह जेष्ठ नेते कारभारी आहेर, शिवसेना नेते संदीप कपाळे, उद्योजक संदीप रोहकले, उपसरपंच माऊली वरखडे, मारुती रोहकले, सरपंच विमल झावरे, सरपंच प्रकाश गाजरे, शंकर बर्वे, संतोष शेलार, भगवान वाळुंज, भाऊ सैद, दिलीप पाटोळे, पो. मा. झावरे, बाळासाहेब झावरे, शरद पाटील, महादू भालेकर, सूर्यभान भालेकर, विठ्ठल झावरे, बापूसाहेब गायखे, संतोष ढोकळे, चेअरमन शिवाजी रोकडे, सचिन सैद, संजय भोर, पप्पू कासुटे, इंजि प्रसाद झावरे, इंजि. निकील झावरे, स्वप्नील झावरे, गणेश शिरतार, मनोज झावरे, अशोक भालेकर, संतोष भालेकर, अभिनव पाटोळे, संग्राम झावरे, अशोक पाटोळे, संतोष दाते, कैलास भालेकर, साहेबराव गुंजाळ, लक्ष्मण झावरे,नारायण झावरे, किरण पोपळघट, कुलदीप शिरतार, महेश झावरे, पांडुरंग आहेर, भास्कर शिंदे, संकेत झावरे, दत्तात्रय जगदाळे, आदी यावेळी उपस्थित होते. पारनेर तहसीलदार जनतेचे सेवक असले पाहिजेत, मात्र ते माज दाखवत आहेत. वयोवृद्ध नागरिकांशी अरेरावी करणे आणि अपमानास्पद वागणूक देणे लोकशाहीत खपवून घेतले जाणार नाही. अशा अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन झाले पाहिजे, अन्यथा आम्ही यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडू.

# 'भाजप-राष्ट्रवादी युतीचा नगरमध्ये रोड शो'

- अहिल्यानगरचा महापौर युतीचाच - भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यात महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी निर्माण झालेले वातावरण पाहता सर्व महापालिकांमध्ये युतीची सत्ता येईल व जास्तीत जास्त महापौर युतीचेच होतील अशी शक्यता आहे. महापालिकेच्या विकासासाठी केंद्र व राज्य प्रमाणे अहिल्यानगर महानगरपालिकेतही युतीच्या विचाराची सत्ता येणे आवश्यक आहे.

अहिल्यानगर मध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप तसेच दोन्ही पक्षांचे पदाधिकारी निवडणुकीसाठी चांगले उत्कृष्ट नियोजन करत आहेत. शहर स्मार्ट व्हावे आधुनिक इन्फ्रास्ट्रचर नगर मध्ये यावे यासाठी केंद्र व राज्य सरकार निधी देत आहे. त्यामुळे जनतेने भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्याच मागे उभे राहावे. अहिल्यानगर शहरात युतीचाच महापौर बसवण्याची जबाबदारी मी सर्व जनतेवर देत आहे, असे आवाहन भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.

महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी सकाळी ग्रामदैवत विशाल गणपती मंदिरात महाआरती करून व नारळ वाढवून झाला. त्यावेळी ते दिल्ली गेट येथील सभेत व प्रसिद्धी माध्यमांशी बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंधारण मंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आ.संग्राम जगताप, भाजपचे महामंत्री वीजय चौधरी व रवींद्र अनासपुरे, निवडणूक प्रमुख आ.विक्रमसिंह पाचपुते, भाजपा शहरजिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, विनायक देशमुख, सुनील रामदासी, माणिकराव विधाते यांच्यासह दोन्ही पक्षांचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते.

यावेळी माळीवाडा ते दिल्लीगेट अशी भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. प्रचार रॅलीमध्ये जीपमध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप होते. दिल्ली गेट येथे प्रचार रॅली आल्यावर त्या ठिकाणी विरात सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप यांनीही मनोगत व्यक्त करून महानगरपालिकेत युतीचाच महापौर होणार असल्याचे सांगत भाजपा राष्ट्रवादी युतीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्यावे असे आवाहन केले. अहिल्यानगरमध्ये महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप-राष्ट्रवादी युतीच्या उमदेवारांच्या प्रचाराचा नारळ सोमवारी फोडण्यात आला. यावेळी माळीवाडा वेस ते दिल्लीगेटपर्यंत रोड शो करण्यात आला. या रोड शोमध्ये भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्यासह पदाधिकारी, उमेदवार कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युतीने शहात जोरदार शक्तीप्रदर्शन केल्याने महापालिका निवडणुकीत चर्चेला उधाण आले आहे.

# पाच बिनविरोध उमेदवारांना मतदारांनी 'नोटा' व्दारे नकार देण्याच्या अधिकाराची मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



उमेदवार बिनविरोध निवडून आला म्हणून मतदारांचा नकाराधिकार संपतो का? असा थेट आणि घटनात्मक सवाल उपस्थित करत येथील नागरिक दिगंबर लक्ष्मण गेंट्याल यांनी राज्य निवडणूक आयोग आणि महापालिका आयुक्त तथा निवडणुकीचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी यशवंत डांगे यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे.

महापालिका निवडणुकीत बिनविरोध निवड झालेल्या पाच उमेदवारांनाही मतदारांनी 'नोटा' व्दारे नकार देण्याचा अधिकार मिळावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. २०१३ साली सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाचा दाखला देत, मतदारांना उमेदवार नकाराधिकार हा मूलभूत आणि घटनात्मक अधिकार असल्याचे गेंट्याल यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे.तत्कालीन मुख्य न्यायाधीश पी. सत्यशिवम यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा अधिकार मान्य केल्यानंतर निवडणूक आयोगाने ईव्हीएममध्ये 'नोटा' बटणाची तरतूद केली, हेही त्यांनी अधोरेखित केले.

अहिल्यानगर महापालिकेत पाच नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याची घोषणा करण्यात आली आहे.उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी विरोधात कोणताही उमेदवार नसल्याने आयोगाने ही निवड जाहीर केली. ही प्रक्रिया कायदेशीर असली, तरी त्यातून मतदारांचा नकाराधिकार हिरावून घेतला जात असल्याचा आक्षेप गेंट्याल यांनी नोंदवला आहे.

# ॲन्युइटी : निवृत्ती नियोजनासाठीचा एक भक्कम पाया

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

आर्थिकदृष्ट्या सुरक्षित निवृत्त जीवन हे आयुष्यभर टिकणाऱ्या स्थिर उत्पन्नाच्या पायावर मजबूत उभे असते. त्यामुळे, निवृत्तीनंतर आर्थिक स्वातंत्र्य राखण्यासाठी ॲन्युइटी हा पाया ठरला आहे. वाढते आयुर्मान, वाढती महागाई आणि बाजारातील अस्थैर्य अशा घटकांमुळे अंदाजित उत्पन्नाची गरज पूर्वीपेक्षा जास्त महत्त्वाची बनली आहे. आजचे निवृत्ती नियोजन फक्त बचतीपुरते मर्यादित नाही. त्यासाठी एक विश्वासार्ह उत्पन्न प्रवाह तयार करणे आवश्यक आहे जो निवृत्तीनंतरच्या दीर्घ वर्षांमध्ये एक चांगले राहणीमान देऊ शकेल.

ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्सने कंटारच्या भागीदारीत केलेल्या इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडी ५.० (आयआरआयएस ५.०) मध्ये अंदाज वर्तवण्यात आला आहे की पुढील ५-१० वर्षांत सुमारे १२० दशलक्ष भारतीय लोक निवृत्त होतील. यातून स्थिर, खात्रीशीर उत्पन्न उपायांसाठी वाढत्या मागणीच्या आगामी ट्रेंडचे संकेत मिळतात.

अनुराग गुप्ता, ईव्हीपी आणि मुख्य व्यवसाय अधिकारी भागीदारी चॅनल, ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स म्हणाले की, आयआरआयएस ५.० च्या अभ्यासानुसार देशाच्या निवृत्ती तयारी निर्देशांकात लक्षणीय वाढ झाली आहे. ती २०२५ मध्ये ४८ पर्यंत वाढली आहे. ती मागच्या तीन वर्षांत ४४ होती. तथापि, यातून निवृत्तीसाठीच्या तयारीतील मोठ्या तफावतीचे संकेतदेखील दिसतात. सुमारे ७० टक्के शहरी भारतीयांना निवृत्तीबद्दल आत्मविश्वास वाटतो, परंतु त्याहूनही कमी लोकांना आयुष्यभराचे उत्पन्न मिळाले आहे. तसेच त्यापैकी ७७ टक्के लोकांचा असा विश्वास आहे की शांततापूर्ण निवृत्तीसाठी १ कोटी किंवा त्यापेक्षा कमी रक्कम पुरेशी आहे. त्यात पुढील दशकात वाढणाऱ्या महागाईचा पुरेसा विचार केलेले दिसत नाही.

पारंपरिकपणे ॲन्युइटीजकडे फक्त निश्चित परतावा देणारे साधन म्हणून पाहिले जात असे. आज, ते आश्वासन, विश्वासार्हता आणि दीर्घायुष्य व बाजाराशी संबंधित जोखीम या दोन्हींपासून संरक्षण दर्शविणारे म्हणून विकसित झाले आहेत. ॲन्युइटीज ही विस्तृत तफावत भरून काढण्यासाठी एक आदर्श साधन आहे, कारण ते संपत्तीचे सुसंगत, अंदाजित उत्पन्नात रूपांतर करण्यास मदत करते. त्यामुळे लोकांना लवचिकतेसह स्थैर्य मिळवणे शक्य होते.

# इलेक्ट्रिक स्कूटर आता ४० मिनिटांत चार्ज होणार

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

इलेक्ट्रिक वाहन वापरकर्त्यांसाठी एथर इलेक्ट्रिक स्कूटर आता केवळ ४० मिनिटांत चार्ज होणार आहे. कायनेटिक चौक व सावेडी येथील एथर इलेक्ट्रिक स्कूटर शोरूममध्ये नागरिकांच्या सोयीसाठी अत्याधुनिक ६ किलोवॅट क्षमतेचा फास्ट चार्जर उपलब्ध करून देण्यात आला आहे. यापूर्वी एथर स्कूटरसाठी ३ किलोवॅट क्षमतेचे चार्जर उपलब्ध होते. त्यामुळे स्कूटर पूर्ण चार्ज होण्यासाठी अधिक वेळ लागत होता. मात्र आता कंपनीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत ६ किलोवॅटचा फास्ट चार्जर उपलब्ध केल्याने चार्जिंगचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी झाला आहे.

# अध्यक्षपदी महंमद पठाण तर सचिवपदी राजेंद्र घोडके

## नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल अभिनंदनाचा वर्षाव

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

मिरजगाव सोशल प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी पत्रकार महंमद पठाण यांची तर सचिवपदी राजेंद्र घोडके यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

कर्जत तालुक्यातील मिरजगाव शहर व परिसरातील पत्रकारांची दि.६ जानेवारी रोजी पत्रकार दिनाचे औचित्य साधून बैठक संपन्न झाली. या बैठकीत नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

मिरजगाव सोशल प्रेस क्लबचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार किशोर आखाडे यांच्या अध्यक्षतेखाली ही नूतन वर्षाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. या नूतन कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी मिरजगावचे दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार महंमद पठाण यांची,



उपाध्यक्षपदी सुधीर आखाडे तर सचिवपदी राजेंद्र घोडके व खजिनदारपदी सुनिल कांबळे यांची निवड करण्यात आली. तसेच जिल्हा कार्यकारिणीत ज्येष्ठ पत्रकार संजय यादव, विनायक चव्हाण, आशिष निंबोरे, भाऊसाहेब वाडगे तर कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड.शफीक शेख, ॲड. अभय खेतमाळस यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून सतीश शिंदे, अशोक सूर्यवंशी, बबन म्हस्के, शाहरुख पठाण आदींचा समावेश आहे. यावेळी पत्रकारांचे प्रश्ना बरोबर सामाजिक प्रश्न सुध्दा सोडवण्यासाठी संघटना काम करणार असल्याचे बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे सर्वांनी एकत्रित येऊन संघटना बळकट करावी, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी प्रेस क्लबच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सदगुरू उद्योग समूहाचे अध्यक्ष उद्धवशेठ नेवसे यांच्या वतीने शाल - श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉक्टर विलास कवळे, संजय घोडके सर, कुलदीप गंगावणे, अशोक काकडे, डॉक्टर अशोक त्रिंबके आदी उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल मिरजगाव व परिसरामधून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे..

# आयडीएफसी फर्स्ट बँकेने झिरो-फॉरेक्स डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्ड लॉंन्च!

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




आयडीएफसी फर्स्ट बँकेने आज झिरो-फॉरेक्स डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्ड लॉंच करण्याची घोषणा केली, ही प्रीमियम ट्रॅव्हल आणि लाइफस्टाइल ऑफर प्रामुख्याने श्रीमंत जागतिक प्रवाशांसाठी आहे ज्यांना झिरो फॉरेक्स मार्कअप, ट्रॅव्हल लाउंज, ॲक्सिलरेटेड ट्रॅव्हल रिवॉर्ड्स आणि लाइफस्टाइल विशेषाधिकारांचा प्रस्ताव मिळवायचा आहे.

डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्डची प्रमुख प्रवास आणि लाइफस्टाइल वैशिष्ट्ये:

- सर्व आंतरराष्ट्रीय खर्चावर ०% फॉरेक्स मार्कअप.
- ॲपद्वारे हॉटेल बुकिंगवर खर्च केलेल्या प्रत्येक ₹१५० साठी ६० पर्यंत रिवॉर्ड पॉइंट्स मिळवा. प्रत्येक रिवॉर्ड पॉइंटचे मूल्य ₹०.२५ आहे, म्हणजे प्रत्येक ₹१५० खर्च केलेल्यावर ₹१५ परत मिळतो—हॉटेलमध्ये राहण्यावर प्रभावी १०% मूल्य परत मिळते.
- ॲपद्वारे फ्लाइट बुकिंगवर खर्च केलेल्या प्रत्येक ₹१५० साठी ४० पर्यंत रिवॉर्ड पॉइंट्स मिळवा. प्रत्येक ₹१५० खर्चावर ते ₹१० परत मिळते—फ्लाइट बुकिंगवर प्रभावी ६.६% मूल्य परत मिळते.
- मासिक खर्चावर खर्च केलेल्या प्रत्येक ₹१५० साठी १० रिवॉर्ड पॉइंट्स मिळवा. प्रत्येक रिवॉर्ड पॉइंटचे मूल्य ₹०.२५ आहे, तर खर्च केलेल्या प्रत्येक ₹१५० वर ते ₹२.५ परत मिळते—प्रभावी १.६६% मूल्य परत मिळते.
- दर तिमाहीत २ देशांतर्गत लाउंज भेटी आणि २ आंतरराष्ट्रीय लाउंज भेटी.
- दर महिन्याला २ मोफत गोल्फ राउंड किंवा लेसन.
- वार्षिक १००० यूएसडी (USD) खर्चावर एक मोफत मीट अँड ग्रीट विमानतळ सेवा.
- दर महिन्याला एक-एक-एक चित्रपट तिकीट खरेदी करा.
- आयटीसी हॉटेल्स: २ रात्री बुक करा आणि तिसरी रात्र मोफत मिळवा.
- २५००० रुपयांचे मोफत ट्रिप रद्द करण्याचे कव्हर.
- हरवलेल्या सामानासाठी, विलंब झालेल्या फ्लाइटसाठी विमा कव्हर, १ कोटी रुपयांचे विमान अपघात कव्हर, रु. १० लाख रुपये.

आयडीएफसी फर्स्ट क्रेडिट कार्ड्सची इतर खास वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे लागू राहतील:

- डायनॅमिक व्याजदर ८.५% प्रति वर्षापासून सुरू होतात, जे या श्रेणीतील सर्वात कमी आहेत
- जागतिक स्तरावर एटीएम कॅश काढण्यावर पेमेंटच्या तारखेपर्यंत ०% व्याज. प्रति पैसे काढण्यासाठी नाममात्र शुल्क ₹१९९.
- रिवॉर्ड पॉइंट्सची मुदत संपत नाही - आजीवन वैधता.
- कोणत्याही ई-कॉमर्स किंवा ऑनलाइन खरेदीवर रिवॉर्ड पॉइंट्स रिडीम करण्याचे स्वातंत्र्य.
- अमर्यादित कमाई - रिवॉर्ड पॉइंट जमा होण्यावर कोणतीही मर्यादा किंवा कृत्रिम मर्यादा नाही.
- प्रति बिलिंग सायकल २०,००० रुपयांपेक्षा जास्त खर्च करणाऱ्या क्रेडिट कार्डवरील १०X पर्यंत रिवॉर्ड पॉइंट्स
- निवडक इंधन स्टेशनवर इंधन अधिभार माफी.

₹३,००० + जीएसटी या किमतीचे, डायमंड रिझर्व्ह क्रेडिट कार्ड ₹६ लाख वार्षिक खर्चावर वार्षिक शुल्क माफीसह आकर्षक प्रीमियम प्रस्ताव देते.


# व्याख्यानमालेचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्वामी विवेकानंद विचारमंचाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून येत्या 8 ते 12 जानेवारी दरम्यान व्याख्यानमालाचे आयोजन करण्यात आले आहे. अण्णाभाऊ साठे सभागृह, बिबवेवाडी, पुणे येथे दररोज सायं ६.३० वा. ही व्याख्यानमाला पार पाडणार आहे. यासाठी प्रवेश विनामूल्य असणार आहे. या व्याख्यानमालेत येत्या गुरुवारी दि. ८ जानेवारीला ब्रिगेडिअर (निवृत्त) हेमंत महाजन यांचे ऑपरेशन सिंदूर या विषयावर व्याख्यान होणार आहे. तर दि.9 रोजी मा. सुबुही खान (सुप्रीम कोर्ट लॉयर) यांचे आज का हिंदुत्व या विषयावर व्याख्यान होणार आहे. शनिवार दि. १० रोजी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांचे छ. शिवाजी महाराजांची अष्टसूत्री या विषयावरील व्याख्यान होणार आहे.

# गॅलेक्सी बुक च्या आकर्षक नवीन डिझाइनमध्ये एआय-समर्थित उत्पादकता आणि प्रगत कार्यक्षमतेचा अनुभव घ्या

**पुणे : (समर्थ गांवकरी)**





सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने आज सीईएस 2026 दरम्यान गॅलेक्सी बुक अल्ट्रा, गॅलेक्सी बुक प्रो आणि गॅलेक्सी बुक लॉंच केले. आतापर्यंतच्या सर्वात प्रगत गॅलेक्सी बुक सिरीजमधील या डिवाईसेसमध्ये उत्तम कार्यक्षमता आहे, जी परिपूर्णपणे संतुलित स्लिम प्रोफाइलमधील अचूक डिझाइनच्या माध्यमातून एआय-समर्थित उत्पादकता वाढवते.

सॅमसंगमध्ये आमचा विश्वास आहे की, खरी नाविन्यता मुलभूत गोष्टी योग्य करण्यासह सुरू होते, असे सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्समधील मोबाइल एक्स्पीरिअन्स (एमएक्स) बिझनेसचे अध्यक्ष, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर (सीओओ) आणि आरअँडडी ऑफिसचे प्रमुख वोन-जून चोई म्हणाले. गॅलेक्सी बुक सिरीजसह आम्ही विश्वासार्ह एआयच्या माध्यमातून अद्वितीय गती व क्षमतेला एकत्र केले आहे, ज्यामधून वापरकर्त्यांना सॅमसंगकडून अपेक्षित असलेली अपवादात्मक उत्पादकता व सर्जनशीलता क्षमता मिळतील.

अद्वितीय कार्यक्षमतेसाठी डिझाइन करण्यात आलेली सिरीज

अत्याधुनिक हार्डवेअरसह स्लिम व पोर्टेबल डिझाइनमध्ये सर्वोत्तम व्हिज्युअल्स व ऑडिओ असलेल्या गॅलेक्सी बुक सिरीजमध्ये सॅमसंगची सर्वात प्रगत पीसी कार्यक्षमता आहे. इंटेल® कोअर™ अल्ट्रा सिरीज 3 प्रोसेसर्सची शक्ती, इंटेल 18ए वर डिझाइन करण्यात आलेल्या पहिल्या क्लायण्ट सिस्टम-ऑन-चिप्स (एसओसी) यांसह गॅलेक्सी बुक कार्यक्षम, हाय-स्पीड सीपीयू, जीपीयू व एनपीयू1 कार्यक्षमता देते, ज्यामुळे अत्यंत गतीशील प्रोसेसिंग, विनासायास मल्टीटास्किंग आणि अधिक प्रतिसादात्मक एआयची खात्री मिळते.

# ज्ञानसंपदा शाळेत व्याख्यानमालेचे आयोजन








**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

येत्या दि. ९ जानेवारी ते रविवार ११ जानेवारी २०२६ रोजी ज्ञानसंपदा शाळेत विद्यार्थ्यां, पालक तसेच नगरकरांच्या विचारात भर पडावी, त्यांची वैचारिक प्रगल्भता वृद्धिंगत व्हावी या उद्देशाने विविध क्षेत्रातील विचारवंत, साहित्यिक, ज्येष्ठ पत्रकार, लेखक इतिहासकार, कलाकार, प्रशासकीय अधिकारी, इत्यादी मान्यवरांचे ज्ञानसंपदा व्याख्यानमालेत व्याख्यानाचे आयोजन केले जाते. यंदा या व्याख्यानमालेचे सलग १५ वे वर्ष आहे. यंदाच्या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प शुक्रवार दि. ९ जानेवारी २०२६ रोजी जडण-घडण मासिकाचे मुख्य संपादक डॉ. सागर देशपांडे हे 'पुस्तकात न मावणारी माणसं' या विषयावर गुंफणार आहेत. तर शनिवार दि. १० जानेवारी २०२६ रोजी थोर शिक्षण तज्ञ व लेखिका रेणूताई दांडेकर ह्या 'व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावर आपले मौलिक विचार मांडणार आहेत. तसेच दि. ११ जानेवारी २०२६ रोजी अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी हे 'भविष्याचा वेध घेताना' या विषयावर आपले अलौकिक विचार मांडणार आहेत.

# कॅलिफोर्निया बदाम वजन व्यवस्थापनास मदत करतात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




नवीन वर्षाची सुरुवात होत असताना आणि आरोग्याची उद्दिष्ट्ये केंद्रस्थानी येत असताना, वजन व्यवस्थापन अनेकदा नवीन वर्षाच्या संकल्पांच्या यादीत अग्रस्थानी असते. लोक त्यांच्या दिनचर्येत बदल करत असताना आणि अधिक तंदुरुस्त व उत्साही वाटण्यासाठी शाश्वत मार्ग शोधत असताना, सजग आहार आणि संतुलित पोषणाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित होते.

या बदलाचे दर्शन घडवत, अल्मंड बोर्ड ऑफ कॅलिफोर्नियाच्या सहकार्याने केलेल्या नवीन YouGov सर्व्हेमध्ये असे दिसून आले आहे की, भारतीय ग्राहक आणखी आरोग्यदायी निवडी स्वीकारत आहेत — नियमित व्यायाम करण्यापासून ते दैनंदिन तंदुरुस्तीला समर्थन देणारे पोषक अन्न निवडण्यापर्यंत.

यापैकी, कॅलिफोर्निया अल्मंड सकाळच्या दिनचर्येत आणि नाश्त्याच्या सवयींमध्ये प्रमुख स्थान टिकवून आहेत, आणि अनेकजण त्यांना वाढलेली तृप्ती, खाण्याच्या इच्छेवर अधिक चांगले नियंत्रण आणि दिवसभर टिकणाऱ्या ऊर्जेशी जोडतात.

भारतातील १६ शहरांमध्ये करण्यात आलेल्या या सर्व्हेमध्ये आरोग्य-केंद्रित जीवनशैलीकडे होणारा व्यापक बदल दिसून आला आहे. बहुसंख्य लोक (९२%) आरोग्य आणि पोषण यामध्ये उच्च रुची दाखवत आहेत, तर ५१% लोक दैनंदिन व्यायामासह सक्रिय जीवनशैली अंगीकारत असल्याचे सांगतात. याशिवाय, ६३% प्रतिसादक म्हणतात की ते वजन नियंत्रणासाठी प्रयत्नशील आहेत — सहसा दैनंदिन व्यायाम, पुरेसे पाणी पिणे आणि साखरेचे सेवन कमी करणे यासारख्या सातत्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करून.

सजग आहाराकडे दिला जाणारा हा भर भारतभरातील बदाम सेवनाच्या सवयींमध्ये स्पष्ट दिसतो. जवळपास ४०% प्रतिसादक म्हणतात की ते दररोज बदाम खाण्याची सवय ठेवतात, त्यापैकी सुमारे ३०% सकाळी उठताच खावीत, तर २२% नाश्त्यासह त्यांचा समावेश करतात. बदाम खरेदीची वारंवारिताही मजबूत आहे — ४३% लोक दरमहिन्याला खरेदी करतात, तर ४४% लोक साप्ताहिक किंवा दु:साप्ताहिक खरेदी करतात. प्राधान्ये वेगवेगळी आहेत — ३०% लोक भिजवलेले किंवा भिजवलेले व सोललेले बदाम पसंत करतात, तर २५% लोक सुरळा बदाम खाऊन तृप्ती मिळवतात. कोरडेफळ खाणाऱ्या लोकांमध्ये, ८६% लोक बदाम निवडतात, ज्यामुळे त्यांची व्यापक लोकप्रियता अधोरेखित होते.

बदाम सेवनामागील प्रेरणा त्यांच्या पोषणात्मक फायदे याबद्दल असलेल्या जाणीवेचे प्रतिबिंब दर्शवते. अर्ध्या हून अधिक प्रतिसादक (५२%) बदामांना संपूर्ण आरोग्य आणि तंदुरुस्तीशी जोडतात, तर ४१% लोक त्यांना इम्युनिटीशी संबंधित मानतात आणि ३९% लोक प्रथिने सेवन टिकवण्यासाठी खातात. महत्त्वाचे म्हणजे, ७५% लोक म्हणतात की बदाम दैनिक दिनक्रमाचा भाग आहेत आवश्यक पोषक घटकांसाठी, तर ८४% लोक हे आरोग्यदायी पर्याय मानतात. जवळपास ४०% लोक बदाम खातेवेळी कॅलरीज किंवा मॅक्रो ट्रॅक करतात, जे पोषणाबद्दल वाढत्या जाणीवेचे सूचक आहे.

ही सकारात्मक धारणा बदामांच्या नैसर्गिक पोषकत्वावर आधारित आहे. कॅलिफोर्निया बदाम १५ आवश्यक पोषक घटक प्रदान करतात, ज्यात सकारात्मक चरबी, आहार तंतू, प्रथिने, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि झिंक यांचा समावेश आहे, ज्यामुळे ते दैनंदिन आहारासाठी कमी प्रक्रियायुक्त, संपूर्ण आणि पौष्टिक अन्नाचा भाग ठरतात.

वजन व्यवस्थापन हा बदाम सेवनामागील मुख्य प्रेरक घटक म्हणून उभा राहतो.

७०% प्रतिसादकांचा असा विश्वास आहे की बदाम आरोग्यदायी वजन उद्दिष्टांना समर्थन करतात, तर ८२% म्हणतात की नियमित सेवनानंतर खाण्यावरील नियंत्रण आणि वजनात सुधारणा दिसून आली आहे. जवळपास अर्ध्यांपैकी ४७% लोक म्हणतात की त्यांनी अस्वास्थ्यदायी स्नॅक्स बदलून बदामांचा समावेश केला आहे.